मुंबई ■ सांगली ■ कोल्हापूर ■ नवे विचार...नवी सुरुवात ■ RNI NO. MAHMAR/2020/79996

दैनिक

# हॅलो प्रभात

■ मुख्य संपादक : गणेश पाटील (सावर्डेकर) Mo. 9011889001

■ सांगली ■ कोल्हापूर ■ सातारा ■ पुणे ■ अहिल्यानगर ■ वर्ष : ६ ■ अंक : १७३ ■ गुरुवार, २५ सप्टेंबर २०२५ ■ किंमत : ३ रुपये ■ पाने : ४




तुमचं वृत्तपत्र आता तुमच्या मोबाईलवर!

खालील QR कोड स्कॅन करा आणि आजचा e-paper वाचा.

हॅलो प्रभात

सोबत वाचनाचा नवा डिजिटल अनुभव

सहज, जलद आणि स्मार्ट!

# ‘संजयकाका’ आता ताकद दाखवाच !

## कार्यकर्त्यांकडून ‘काकांना’ आवाज



## जयंतराव हे संजयकाकांचे एकेकाळचे राजकीय गुरुच?

**सांगली : हॅलो प्रभात**

वारंवार घर बदलणाऱ्याचं मन कधीच एका ठिकाणी रमत नाही काँग्रेस, राष्ट्रवादी, काँग्रेस यानंतर भाजपचे कमळ, पुन्हा घड्याळ असा दीर्घ प्रवास करून संजयकाका विसावले. केंद्रात सत्ता आणि खासदारकी जवळ असताना सगळ्यांना मिळून मिसळून राजकीय वाटचाल करायची हे काहीजणांना जमतच नाही. तब्बल दहा वर्षे सत्ता आपण व आपल्या कार्यकर्त्यांना भोगायला देऊन आता मात्र संजयकाका पुन्हा नवीन वाट शोधत आहेत. राजकारणाच्या आखाड्यात नव्या रंगाचा लंगोट बांधण्याच्या तयारीत आहेत. अशी चर्चा राजकीय वतुर्ळात केली जात असली तरी फैसला शनिवारी होर्णाया बैठकीतच होणार आहे. मांजरी आपल्या नवजात पिल्लांना बरोबर घेऊन सात घरे पुजते. हे तर राजकारण आहे, कशाचीच मर्यादा नाही पण आपण आणि आपल्या समर्थकांना सत्तेची चव चाखायला देणारे संजयकाका सध्यातरी एकाकी असल्याचे दिसत असले तरी राजकारणात वेळ कधी बदलेल याचे भाकित भलेभले राजकीय जानकार करू शकत नाहीत. शनिवारच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात आपल्याला सोयिस्कर काय, याचा शोध घेतला जाईल, पण योग्य मार्ग निघणार का? याबाबत मात्र साशंकता आहे. केंद्रात भाजप आणि राज्यात महायुतीची सत्ता असताना, ती सत्ता संजयकाका आणि त्यांच्या समर्थकांनी कमळ हातात घेऊन भोगली, पण आता मात्र सत्ते शिवाय वनवास सोसावा लागतोय हेच तर अस्वस्थतेचे खरे कारण आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका उंबरठ्यावर आल्याने सर्वच राजकीय पक्षांना नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची गरज आहे. जिल्ह्यात एकाकी पडलेल्या राष्ट्रवादी शरद पवार काँग्रेसकडून नेत्यांची आणि कार्यकर्त्यांची जुळवाजुळव सुरू आहे. तसे पाहता जयंतराव हे काकांचे एकेकाळचे राजकीय गुरु आहेत, असे जे बोलले जाते त्यात काही चुकीचे नाही. दुष्काळी फोरभ त्यांच्याच तर मार्गदर्शनाखाली स्थापन करण्यात आला होता. राजकीय अस्तित्व टिकवून ठेवणे हा प्रत्येकाचा अधिकार आहे, पण रस्ता सरळ असावा. काकांनी बोलविलेल्या शनिवारच्या बैठकीचा कार्यकर्त्यांची मोठी गर्दी होईल, पण लंगोट कुठला बांधायचा हिरवा की भगवा यावर खल झाला, तर मात्र आतापर्यंत भगवा लंगोट बांधून जिल्ह्यात ताकद दाखवणाऱ्या कार्यकर्त्यांची गोची होणार आहे. कार्यकर्त्यांना कडून मात्र ‘काका’ ताकद दाखवा असा आवाज आहे, त्याला कितपत यश येते हे मात्र स्थानिक च्या निवडणूक निकालानंतर दिसणार आहे.

## संक्षिप्त...

### २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान पाऊस वाढणार

**मुंबई : हॅलो प्रभात**

२४ सप्टेंबरला बंगालच्या उपसागरावर एक कमी दाबाचा पट्टा निर्माण होणार असून २८ तारखेपर्यंत तो राज्यात येण्याची शक्यता आहे. या कमी दाबाच्या पट्ट्याच्या प्रभावामुळे राज्यातील विविध भागांमध्ये २६ ते २८ सप्टेंबर दरम्यान ढगाळ हवामान आणि पावसात वाढ होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

### मेट्रोचे सर्व टप्पे खुले होणार : मुख्यमंत्री

**ठाणे : हॅलो प्रभात**

मेट्रो ४ आणि ४ अ या मार्गिका वडाळा ते छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनल्सला जोडणाऱ्या मेट्रो ११ या मार्गिकेला जोडण्यात येणार असल्याने ५८ कि.मी. लांबीची देशातील सर्वात मोठी मेट्रो मार्गिका ठाणे आणि मुंबईसाठी महत्त्वाची ठरेल. २०२६च्या ऑक्टोबरपर्यंत या मेट्रोचे सर्व टप्पे प्रवाशांकरिता खुले होतील, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

### जवाहर विद्यालयात प्रवेशासाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**सांगली : हॅलो प्रभात**

पी एम श्री जवाहर नवोदय विद्यालय पलूस येथे शैक्षणिक सत्र २०२६-२०२७ साठी इयत्ता ९ वी आणि ११ वी कला व विज्ञान या शाखांसाठी ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्याची प्रक्रिया २५ जुलै २०२५ पासून सुरु झाली आहे. अर्ज भरण्याची अंतिम मुदत दिनांक २३ सप्टेंबर २०२५ होती. आता अर्ज भरण्यासाठी ७ ऑक्टोबर २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. जिल्ह्यातील जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी प्रवेश अर्ज भरून या संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन अनिल कांबळे यांनी प्रसिध्दीपत्रकाव्दारे केले आहे.

## काँग्रेसची हाक, कोल्हापुरकरांनो मराठवाड्याला साथ देऊ या ; आ.सतेज पाटील यांचे आवाहन

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



सध्या मराठवाडा अतिवृष्टीच्या भयंकर संकटातून जात आहे. अनेक गावे पाण्याखाली गेल्याने शेती, घरे, स्वप्नं आणि भविष्य सगळंच वाहून गेलं आहे. त्यामुळे संकटग्रस्त मराठवाड्याच्या मदतीला धावून जाण्याचे आवाहन कोल्हापूर जिल्हा काँग्रेस कमिटीने कोल्हापूरकरांना केले आहे. काँग्रेसचे विधानपरिषदेतील गटनेते तथा जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष आमदार सतेज पाटील यांच्या पुढाकारातून पूरग्रस्त बांधवांच्या मदतीसाठी हात पुढे करुया हा मदतीचा संकल्प काँग्रेसने केला आहे. त्यासाठी किराणा सामान, प्रथमोचार साहित्य, सॅनिटरी पॅडस, चप्पल, स्लीपर्स, पाणी बॉटल्स, पुरुष, महिला, लहान मुलांचे कपडे, ब्लँकेटस, चटई, रेनकोट, टॉवेल्स व शालेय साहित्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

बुधवार पासून ते २८ सप्टेंबर पर्यंत ही मदत जिल्हा काँग्रेस कमिटीत जमा करण्यात येणार आहे. त्यानंतर २९ सप्टेंबरला ट्रकद्वारे ही मदत मराठवाड्यातील पूरग्रस्त विविध जिल्ह्यांमध्ये पाठवण्यात येणार आहे. कोल्हापूरकरांनी महापुराचा वेदनादायक अनुभव घेतला आहे. महापुराच्या काळात देशभरातून मदतीचा हात मिळाला होता.

त्यामुळे आता दातृत्व करण्याची आपली वेळ आहे. ही आपली जबाबदारी असून ही तुमची छोटीशी मदतही पुरग्रस्तांसाठी जीवनरेखा ठरेल. मराठवाडा पुन्हा नव्याने उभा राहण्यासाठी त्यांना मदतीचा हात पुढे करूया असे आवाहन आ. पाटील यांनी केले आहे.

## ३२ लाख शेतकऱ्यांच्या बँक खात्यात अडीच हजार कोटी जमा

### कोणतेही निकष न लावता शेतकऱ्यांना नुकसान भरपाई मिळणार

**मुंबई : हॅलो प्रभात**



मराठवाड्यावर आस्मानी संकट ओढवले असताना महायुती सरकारमधील मंत्री, आमदार, कार्यकर्ते शेतकऱ्यांच्या बांधावर प्रत्यक्ष मदत करण्यात व्यस्त आहेत. तर दुसरीकडे संजय राऊत मुंबईत बसून वायफळ बडबड करून आपल्याला शेतकऱ्यांचा किती कैवार आहे असा आव आणत आहेत अशी टीका भारतीय जनता पार्टीचे माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन यांनी बुधवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत ते बोलत होते. महायुती सरकारकडून आत्तापर्यंत पहिल्या टप्प्यातील अडीच हजार कोटींची मदत ३२ लाख शेतकऱ्यांच्या थेट बँक खात्यात जमा करण्यात आली असून दुसऱ्या टप्प्यात आणखी मदत दिली जाणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशावरून यावेळी कोणतेही निकष न लावता ज्या शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे त्या सर्वांना नुकसान भरपाई मिळणार असल्याचेही श्री. बन यांनी सांगितले. यावेळी श्री. बन यांनी उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना त्यांनी अतिवृष्टीग्रस्त भागात दौऱ्यादरम्यान चक्क कारपेटवर उभे राहून पाहणी केल्याची आठवण करून देत राऊतांवर पलटवार केला. शेतकऱ्यांचे दुःख कारपेटवरून दिसत नाही, तर ते प्रत्यक्ष बांधावर चिखलात उतरल्यानंतर जाणवते. महायुती सरकार शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मदत आणि पाहणी करत आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज सोलापूर, लातूर दौऱ्यावर आहेत. उपमुख्यमंत्री अजित पवार, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, पंकजा मुंडे हे गावोगावी जाऊन शेतकऱ्यांना भेटत आहेत. भाजपा आणि महायुती सरकारचे मंत्री चिखलात उतरून, बांधावर जाऊन शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावून शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहेत.

## अनंतराव पवार अभियांत्रिकीत वेब डेव्ह युझिंग एआय हॅकेथॉन संपन्न

**पुणे : हॅलो प्रभात**



अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेचे अनंतराव पवार कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग अँड रिसर्च पर्वती, पुणे महाविद्यालयाच्या संगणक अभियांत्रिकी विभाग उडख स्टुडंट्स चॅप्टर यांचे संयुक्त विद्यमाने वेब डेव्ह युझिंग एआय हि हॅकेथॉन स्पर्धा घेण्यात आली.

यामध्ये विद्यार्थ्यांनी कॉलेज डॅशबोर्ड पोर्टल विकसित केले ज्यामध्ये लॉस्ट अँड फाऊंड मॉड्यूल आहे सुरक्षित ॲडमिन लॉगिन, वस्तू अपलोड, विद्यार्थ्यांसाठी पाहणी आणि संग्रह इतिहासया बाबींचा सामाबेश आहे. या हॅकेथॉन मुळे विद्यार्थ्यांच्या नवकल्पना व्यासपीठ उपलब्ध झाले.

तसेच विद्यार्थ्यामध्ये टीमवर्क, एआय तंत्रज्ञानाचा व्यावहारिक उपयोग करण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला. या कम्प्युटर इंजीनियरिंग, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, इलेक्ट्रॉनिक्स अँड टेलिकम्युनिकेशन, इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी शाखांच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

सी एस आय चाप्टर चे विद्यार्थी प्रतिनिधी प्रतिक्षा ओव्हाळ, दुर्वेश नारखेडे, प्रसाद धनाडे, संजना जाधव, निगम रॉय यांनी काम पहिले. या हॅकेथॉन चे आयोजन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.सुनील ठाकरे यांचे मार्गदर्शनाखाली डॉ.रमा गायकवाड विभागप्रमुख संगणक अभियांत्रिकी यांनी केले. या स्पर्धेसाठी डॉ.रमा गायकवाड, डॉ.प्रांजली मोरे, प्रा. अमृता मोरे, प्रा.श्वेता जोशी, प्राध्यापकवर्ग, विध्यार्थी उपस्थित होते. महाविद्यालयाने या तांत्रिक विषयावर हॅकेथॉन चे आयोजन केल्याबद्दल अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या सरचिटणीस प्रमिलाताई गायकवाड यांनी सर्वांचे अभिनंदन केले.

## शेतकऱ्यांना तातडीने एकरी ५० हजार नुकसान भरपाई द्यावी : विक्रम सावंत



**जत : हॅलो प्रभात**

जत तालुक्यात सुरू असलेल्या अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे व घरांचे अतोनात नुकसान झालेले असून अनेकांचे संसार रस्त्यावर आलेले आहेत. अशावेळी सरकारने कसलेही आढेवेढे न घेता कर्नाटक राज्याच्या धर्तीवर एकरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी. अशी मागणी सांगली जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष माजी आमदार विक्रम सावंत यांनी पत्रकार परिषदेत केली.

पत्रकार परिषदेनंतर त्यांनी उपविभागीय अधिकारी जत यांना वरील मागणीचे निवेदन दिले. आज शेतकरी हवालदिल झाला असून शेतकऱ्यांच्या अडचणीच्या काळात सरकारने कोणत्याही अटी शर्ती न पाहता शेतकऱ्यांना तातडीने मदत द्यावी. अशी मागणी केली. यावेळी सांगली जिल्हा मार्केट कमिटीचे सभापती सुजय नाना शिंदे, नगरसेवक भूपेंद्र कांबळे, निलेश बामणे, अशोक बननेंवर, बाबासाहेब कोडग यांच्यासह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पालकमंत्री घरगुती गणपती सजावट स्पर्धेचे आज बक्षीस वितरण

**सांगली : हॅलो प्रभात**



सांगली जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली मनपा क्षेत्रात आयोजित घरगुती गणपती सजावट स्पर्धा बक्षीस वितरण कार्यक्रम आज (दि. २५ ) रोजी दु. २ वा. खरे मंगल कार्यालय विश्रामबाग सांगली येथे पालकमंत्री पाटील यांच्या उपस्थितीत आयोजित करण्यात आला आहे.

या उपक्रमात मनपा क्षेत्रातील साडेतीन हजार पेक्षा अधिक स्पर्धकांनी सहभाग दर्शविला होता. प्रथम पारितोषिक ५१ हजार रुपयाचे सोन्याचे नाणे द्वितीय पारितोषिक ३१ हजार रुपये सोन्याचे नाणे व तृतीय पारितोषिक २१हजार रुपये सोन्याचे नाणे व सन्मान चिन्ह देऊन गौरविण्यात येणार आहे. याशिवाय १०० विशेष उत्तेजनार्थ पारितोषिक देण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी प्रत्येक स्पर्धकाला विशेष भेट वस्तू व डिजिटल प्रमाण पत्र देऊन सन्मानीत करण्यात येणार आहे.

याप्रसंगी आ. सुरेश खाडे, आ. सुधीर गाडगीळ, भाजप जिल्हाध्यक्ष प्रकाश ढंग, तसेच भाजप कोअर कमिटी सदस्य, जिल्हा कार्यकारणी सदस्य, मंडल कार्यकारिणी सदस्य तसेच इतर सर्व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

## महिलांनी शासकीय आरोग्य सुविधांच्या योजनांचा लाभ घ्यावा

### आ.जयंतराव पाटील यांचे आवाहन

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**



महिला आपल्या कुटुंबाला वेळ देण्यात इतक्या व्यस्त असतात की, त्यांचे आपल्या आरोग्याकडे अक्षम्य दुर्लक्ष होते. आता महिलांनी शासकीय आरोग्य सुविधा आणि योजनांचा लाभ घेत आपल्या आरोग्याची काळजी घ्यावी, असे आवाहन आ.जयंतराव पाटील यांनी केले. वाळवा तालुक्यातील गावोगावच्या महिलांची कॅन्सर तपासणी करण्यासाठी फिरते पथक उपलब्ध करण्याचा आमचा प्रयत्न राहील, असेही त्यांनी यावेळी सांगितले.

येथील उपजिल्हा रुग्णालयात ‘स्वस्थ नारी, सशक्त परिवार’ या अभियाना तील महिला आरोग्य तपासणी शिबिराच्या उदघाटन समारंभात ते बोलत होते. याप्रसंगी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. विक्रमसिंह कदम,

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.विजय कुमार वाघ, उपजिल्हा रुग्णालयाचे अधिक्षक डॉ.नरसिंह देशमुख, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.प्रविण पाटील, रुग्ण कल्याण समितीचे सुरेश हवलदार प्रामुख्याने उपस्थित होते. प्रारंभी दीप प्रज्वलन व धन्वंतरी प्रतिमा पूजन करण्यात आले.

आ.पाटील पुढे म्हणाले, या आरोग्य तपासणी पंधरवड्यात महिलांच्या आरोग्याची काळजी घेतली जाणार असून त्यातून संपूर्ण कुटुंब सुरक्षित राहू शकते. या शिबारामध्ये कॅन्सर तपासणीसह २४ हजार आजारांची तपासणी व उपचार केले जाणार आहेत. महिलांनी याचा लाभ घ्यावा. सध्या आरोग्य सुविधा मोठया खर्चिक झाल्या आहेत. त्यामुळे सर्व घटकांनी प्रथम शासकीय आरोग्य सुविधा व योजनांचा लाभ घेण्यास प्राधान्य द्यावे. डॉ.विक्रमसिंह कदम म्हणाले, या अभियानात महिलांच्या आरोग्य बाबत मोफत तपासण्या आणि उपचार केले जाणार आहेत. प्रारंभी डॉ. नरसिंह देशमुख यांनी स्वागत व प्रास्ताविक केले.

याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष शहाजी पाटील, परेश पाटील, डॉ. प्रज्ञा पाटील, डॉ.रामतीर्थ चौगुले, डॉ.अविनाश पाटील, डॉ. नितीन शहा, डॉ.विनायक कोरे, डॉ.अभिजित खोत, डॉ.शहाजी शेळके यांच्यासह आशा वर्कर्स, नर्सिंग स्कुलचे विद्यार्थी-विद्यार्थिनी व महिला उपस्थित होत्या.

## नगरपालिका कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभार

### वरिष्ठांच्या आदेशाला केराची टोपली ; कारवाई करण्याची मागणी

**इस्लामपूर : हॅलो प्रभात**



इस्लामपूर नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचा मनमानी कारभार चालू झाला आहे. पाणीपट्टी व घरपट्टी भरण्यासाठी दिवस दिवसभर नगरपालिकेचे आवारामध्ये थांबवून ठेवण्यात येते.

एकीकडे नगरविकास खाते महाराष्ट्रातील नगरपालिका ऑनलाइन झाली आहे असे सांगतात. पण वास्तविक पाहता इस्लामपूर नगरपालिकेचा कारभार मात्र चव्हाट्यावर आला आहे. नगरपालिकेमध्ये कॉन्ट्रॅक्ट पद्धतीने कर्मचाऱ्यांची भरती करून त्यांच्या माध्यमातून मलई गोळा करण्याचे काम वरिष्ठ अधिकारी करतात. सदरचा कॉन्ट्रॅक्टचा ठेका ही आपल्याच मर्जीच्या लोकांना देऊन कर्मचाऱ्यांची भरती केली जाते. ठेकेदाराच्या संबंधित असला तरच काम करायचे नाही तर हेलपाटे घालायला लावायचे हे काम सध्या नगरपालिकेमध्ये चालू आहे. त्यामुळे आता नगरपालिकेच्या मुख्याधिकाऱ्यांचे त्यांच्याच नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यावर वजन राहिले नाही हे मात्र खरे.

> **नागरिकाच्या कामानिमित्त मी गेलो असता नगरपालिकेचे कर्मचारी प्रवीण पाटील व गजानन माळी हे वरिष्ठांचे आदेश येऊन सुद्धा काम करत नाहीत. अशा निष्काळजी कर्मचारी यांना शिवसेना स्टाईलने त्यांना धडा शिकवू. व नागरिकांचे होणारी पिळवणूक थांबू.**
>
> • **अमीर हवलदार** (युवानेते, शिवसेना)

# संपादकीय

## राजकारण खालच्या पातळीवरचे

बेरोजगारी, महागाई, शेतकऱ्यांचे प्रश्न, आरोग्य, शिक्षण यांसारखे ज्वलंत मुद्दे राज्यात हाताबाहेर जाण्याची वेळ आली आहे; मात्र महाराष्ट्र राज्यातील राजकारण हे एकमेकांवर आरोप-प्रत्यारोप करण्यातच गुंतले आहे. राज्यातील नेत्यांवर खालच्या पातळीवर जाऊन टीका करणे ही संस्कृती राज्यातील राजकारणात आता पाय पसरू लागली आहे. लोकप्रतिनिधी म्हणजे जनतेचे प्रश्न सोडवत त्यांच्या अपेक्षा पूर्ण करणे; मात्र गेल्या काही वर्षांत महाराष्ट्रातील राजकारणाने खालची पातळी गाठली आहे. राजकारणात मूळ मुद्द्यांना बगल दिली जात असून, सुसंस्कृत महाराष्ट्राचे राजकारण आता राजकारणापलीकडे गेले आहे. विधानसभा निवडणुकीत जनतेने महायुतीला कौल दिला आणि महाराष्ट्रात महायुतीची सत्ता आहे. महायुतीत मोठा भाऊ भाजप असून, देवेंद्र फडणवीस हे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आहेत. मुख्यमंत्री म्हणजे ते कोणा एका पक्षाचे नाही, तर ते राज्याचे प्रमुख आहेत. त्यामुळे महाराष्ट्राच्या राजकारणात विशेष करून सत्ताधारी पक्षातील मंत्री असो वा आमदार बेताल वक्तव्ये केली तर त्याची जबाबदारी आपसूकच मुख्यमंत्री म्हणून देवेंद्र फडणवीस यांच्यावर येते. त्यामुळे महायुतीतील मंत्री अथवा आमदार काहीही बरळत असतील, तर त्यांना वेसण घालणे राज्याचे प्रमुख म्हणून मुख्यमंत्र्यांची जबाबदारी आहे. महाराष्ट्रात राज्यकारभारापेक्षा, समाजकारणापेक्षा राजकीय खेळ रंगताना अधिक दिसतो. जनतेच्या मूलभूत प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी सत्ताधारी नेते आरोप-प्रत्यारोप करण्यात धन्यता मानतात. बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्न, महागाई, आरोग्य व शिक्षण यांसारखे मुद्दे महायुतीसाठी दुय्यम आहेत की काय? सत्ताधाऱ्यांचे प्राधान्य हे केवळ राजकीय समीकरण जुळवणे, खुर्ची टिकवणे एवढेच मर्यादित राहिले आहे की काय? असा प्रश्न पडतो. त्यामुळे सुसंस्कृत महाराष्ट्रातील राजकारणाने आता महाराष्ट्राची प्रतिमा मलीन करण्याच्या दिशेने वाटचाल सुरू केली आहे का, अशी भीती व्यक्त होणे स्वाभाविक आहे. आज महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्या करत आहेत, शहरी भागात बेरोजगार युवकांची संख्या दिवसेंदिवस वाढते आहे. रुग्णालयांत सोयीसुविधांची ओरड होत आहे. शाळांत शिक्षक नाहीत, विद्यार्थ्यांना गैरसोयींचा सामना करावा लागतो आहे. विद्यार्थ्यांची सुरक्षा रामभरोसे आहे; मात्र महाराष्ट्रातील राजकारणी भाषेवरून राजकारण करण्यात मग्न आहेत. सत्ताधारी असो वा विरोधक 'कोण कुणाला खाली खेचतो' यावरच लक्ष केंद्रित आहे. जनतेच्या प्रश्नांवर संसद, विधानसभेत चर्चा करण्याऐवजी भाषणात अपमान, टोलेबाजी आणि वैयक्तिक टीकेचे राजकारण अधिक सुरू आहे. हे दृश्य महाराष्ट्राच्या समृद्ध राजकीय परंपरेला कलंक लावणारे आहे. महायुती सरकारने जनतेच्या विश्वासाचा मान राखायला हवा होता. मात्र प्रत्यक्षात त्यांनी दिलेल्या आश्वासनांकडे पाठ फिरवली आहे. प्रत्येक जिल्ह्यातील विकासकामांसाठी लागणारा निधी राजकारण्यांमध्ये वाटला जातो. कुठल्या नेत्याचा कोणत्या गटाशी संबंध, त्यावर कामकाज रेटले जात आहे. परिणामी विकासाऐवजी भ्रष्टाचाराला प्राधान्य मिळते, हेही तितकेच खरे. तत्कालीन कृषी मंत्री आताच्या क्रीडा मंत्र्यांनी नाशिक दौऱ्यावर असताना शेतकऱ्यांप्रति अपशब्द वापरले, भाजपमध्ये याल तरच निधी मिळेल, असा धमकीवजा इशारा मंत्री नितेश राणे यांनी कोकणातील एका सभेत दिला. चप्पल, जेवण हे भाजपमुळे तुम्हाला मिळते, असे वक्तव्य भाजपचे आमदार बबनराव लोणीकर यांनी एका जाहीर सभेत केले होते. तर कालपरवा भाजपचे आमदार गोपीचंद पडळकर यांचा जीभेवरील ताबा सुटला आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे नेते महाराष्ट्रातील ज्येष्ठ राजकारणी जयंत पाटील यांच्यावर खालच्या पातळीवर जाऊन टीका केली. तुम्ही लोकप्रतिनिधी तुम्हाला जनतेने त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी निवडून दिले, मात्र पक्षात मी कसा श्रेष्ठ, पक्षातील माझं वजन हेच दाखवण्यात मंत्री व आमदार धन्यता मानतात. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस वेळोवेळी बोलतात महाराष्ट्र आता थांबणार नाही, परंतु त्यांच्याच महायुतीतील नेते-मंत्री-आमदार अशी बेताल वक्तव्ये करत असतील, तर मुख्यमंत्री म्हणून तुम्हाला जबाबदार ठरवले जाणार यात दुमत नाही. सत्ता मिळवण्यासाठी आरोप-प्रत्यारोप इथपर्यंत ठीक, पण सत्तेत आल्यावर तरी भान ठेवून बोलले पाहिजे याचा विचार राजकारण्यांनी करणे गरजेचे आहे. अन्यथा मंत्री-आमदारांची अशी बेताल वक्तव्ये महाराष्ट्राच्या संस्कृतीसाठी काळा डाग ठरतील, याचा विचार दस्तुरखुद्द मुख्यमंत्र्यांनी केला पाहिजे.

# डॉक्टर आणि रुग्ण यांना जोडणारा महत्त्वपूर्ण 'दुवा' फार्मासिस्ट



**हॅलो प्रभात**

**आधुनिक तंत्रज्ञान कितीही फार्मसी क्षेत्रात शिरले तरी फार्मासिस्ट आणि ग्राहक/रुग्ण यांच्यातील नाते घट्ट आहे. दरवर्षी २५ सप्टेंबर हा जागतिक फार्मासिस्ट दिन म्हणून साजरा केला जातो.**

आज संपूर्ण भारतात काही लाखांच्यावर केमिस्टची दुकाने आणि हजारोच्या संख्येत हॉस्पिटल, फार्मासिस्ट आहेत. त्याचा देशाचे आरोग्य सुधारण्यासाठी चांगला उपयोग करून घेता येईल, मात्र त्यासाठी सर्वांचीच मानसिकता बदलणे गरजेचे आहे. पांढऱ्या कोटातील फार्मासिस्ट हसतमुखाने रुग्णाचे स्वागत करतो. त्याची विचारपूस करून त्याच्याकडील प्रिस्क्रिप्शन घेतो. ते बघून रुग्णास काही प्रश्न विचारतो व बसण्याची विनंती करतो. प्रिस्क्रिप्शनमधील पाच-सहा औषधांची नावे संगणकात एन्ट्री करतो. एकमेकात आंतरक्रिया (इंटरॅक्शन) होणारी औषधे नाहीत ना, डोस योग्य आहे ना या बाबींची शहानिशा करतो. रुग्णाचा पूर्वेतिहास तपासतो (संगणकीय रेकॉर्डमधून) नंतर सहायकास सर्व औषधे काढण्यास सांगतो व स्वत: प्रत्येक औषधाचे नाव, मात्रा तपासून काही गोळ्यांच्या स्ट्रीपवर रुग्णाला सूचना देणारी, उदा.- 'रात्री झोपताना एक गोळी', 'सकाळ-संध्याकाळ एक' अशा आशयाची अगदी छोटी लेबल्स चिकटवतो. प्रत्येक औषधासंबंधीची सोप्या भाषेतील माहितीपत्रकाची प्रिंट काढतो. नंतर रुग्णास बोलावून प्रत्येक औषध दाखवून ते रोज किती वेळा, किती दिवस, कसे घ्यायचे व ते नेमके कशासाठी दिले आहे हे थोडक्यात सांगतो. काय खाद्यपदार्थ टाळावेत, काय खावे यासाठी सूचना देतो. रुग्णही त्याच्या सर्व शंकांचे समाधान करून घेतो. फ्लूची (व्हायरल ताप) लस टोचणीही आम्ही करतो, ही नवीन माहिती फार्मासिस्ट देतो. दुकानात मधुमेह, लठ्ठपणा, स्त्रीआरोग्य, व्यसनमुक्ती यासाठी सेवासुविधा उपलब्ध आहेत याकडेही लक्ष वेधतो. रुग्ण फार्मासिस्टला मनापासून धन्यवाद देतो.

## रुग्णाभिमुख फार्मसी : ही तर काळाची गरज!



## २५ सप्टेंबर : जागतिक फार्मासिस्ट दिवस

मोठ्या हॉस्पिटलमधील अंतर्गत (इन पेशंट्स) फार्मसी. त्यातील काही फार्मासिस्ट कॅन्सर रुग्णांसाठी सलाइनमिश्रित काही मिश्रण र्निजतुक विभागात बनवत असतात. मूत्रपिंडाचे काम खालावलेल्या एका रुग्णासाठी मात्रा ठरवण्याबाबत एका डॉक्टरांकडून विचारणा झालेली असते. त्या कामात एक फार्मासिस्ट गर्क असतो. एक ज्येष्ठ फार्मासिस्ट पेशंट वॉर्डमध्ये राऊंडसाठी जातो. डॉक्टर व तो सोबत राऊंड घेत प्रत्येक रुग्णाची औषध सारणी तपासून, औषध योजनेत काही फेरफार करायचा का यावर एकत्र विचारविनिमय करत असतात.

वरील वर्णन वाचून हे औषध दुकान व हॉस्पिटल भारतातील नसावे असा कयास बऱ्याच जणांनी केला असेल व तो अचूक आहेच. काही थोडे देशवगळता बहुतांशी देशांमध्ये थोडाफार फरकवगळता फार्मासिस्टच्या कामाचे स्वरूप वरीलप्रमाणे दिसते. हे सारे फार्मसीजगत आपल्यासाठी तसे फार अनोळखी, अनोखे आहे. फार्मासिस्टची भूमिका विस्तारत आहे व ती अधिकाधिक रुग्णाभिमुख होत आहे. व्यवसायातील बदलत्या घडामोडींचे, प्रगतीचे, समस्यांचे प्रतिबिंब परिषदांमध्ये नेहमीच बघावयास मिळते.

नुकतीच ब्यूनोस आयर्स (अर्जेंटिना) येथे जागतिक फार्मसी परिषद पार पडली. विस्मरण, वृद्धत्व, नैसर्गिक आपत्ती, अँटिबायोटिक रेझिस्टन्स, मनोविकार, आरोग्य साक्षरता, गरोदर माता व लहान मुले या व अशा अनेक विषयांवर येथे चर्चा झाल्या. वेगवेगळ्या देशांतील फार्मासिस्ट यासाठी काय काम करत आहेत व अजून फार्मासिस्टची भूमिका कशी समृद्ध होईल व समाजास अधिकाधिक फायदा मिळेल, या अनुषंगाने चर्चा झडल्या. तंत्रज्ञानाचा वापर करून रुग्ण समुपदेशन कसे परिणामकारक करता येईल किंवा फार्मासिस्टच्या कामामुळे उच्च रक्तदाब/मधुमेह/ अस्थमा अशा रुग्णांमध्ये कसे सकारात्मक बदल झाले याविषयीही चर्चा होत्या. अलीकडेच आंतरराष्ट्रीय फार्मास्युटिकल फेडरेशनने 'लसीकरण व फार्मासिस्टची भूमिका' असा अहवाल प्रकाशित केला. वरील विषयांची जंत्री देण्याचे कारण फार्मासिस्टची भूमिका किती व्यापक होत आहे, औषध विक्री हा कामाचा गाभा असला तरी अनेक आरोग्यसेवा देणारे 'हेल्थ आणि वेलनेस'चे केंद्र म्हणून फार्मसीकडे पाहिले जात आहे. फार्मासिस्ट हा रुग्ण व डॉक्टर यातील दुवा आहे. आरोग्यसेवेतील महत्त्वाचा घटक आहे व इतर आरोग्य व्यावसायिकांना फार्मासिस्टच्या ज्ञानाचा आदर व कामाची कदर आहे. या पातळीवर फार्मसी व्यवसाय नेऊन ठेवताना अनेक देशांमध्ये फार्मासिस्टना संघर्षांतूनही जावे लागले, अजूनही जावे लागते. पण एकंदर शिक्षण, कायदे, धोरणे, आर्थिक मोबदला याची अनुकूलता असल्याने फार्मासिस्ट आज एक 'अत्यंत विश्वसनीय असे व्यावसायिक' समाजाला वाटतो. इंटरनेट फार्मसी, टेलिमेडिसिन, रोबोटने काम असे आधुनिक तंत्रज्ञान फार्मसी क्षेत्रात शिरले तरी फार्मासिस्ट व ग्राहक/ रुग्ण यांच्यातील नाते घट्ट आहे. खरे तर ते अधिकाधिक समृद्ध होताना दिसत आहे. फार्मासिस्ट-रुग्ण यांच्यातील भावनिक बंधाकडे नेमकेपणाने लक्ष वेधणारे असे. 'फार्मासिस्ट : केअरिंग यू' हे ब्रीदवाक्य या फार्मासिस्ट दिनाचे आहे. केअरिंग वा काळजी घेणे याची व्याख्या तशी कठीण, पण विल्यम केली व एलिएट सोगोल या लेखकद्वयाने लिहिलेल्या 'द गुड फार्मासिस्ट' या पुस्तकात ते म्हणतात, 'दुसऱ्याला वेळ देणे, त्याची समस्या शांतपणे समजून घेणे, समस्येत रस दाखवणे, उपाययोजनेत सहभागी होणे म्हणजे केअरिंग व फार्मासिस्ट जेव्हा रुग्णाची काळजी घेतो तेव्हा रुग्णामध्ये निश्चितच सकारात्मक फरक पडतो.'

या सर्व पार्श्वभूमीवर जेव्हा आपण भारतातील फार्मसी प्रॅक्टिसकडे नजर टाकतो तेव्हा एकदम हरवल्यासारखी स्थिती होते, प्रचंड पोकळी जाणवते. फार्मासिस्टची भूमिका जशी घडायला हवी तशी ती अजूनही घडलेली नाही. औषध दुकानात 'विक्रेता' व रुग्णालयात औषधे देणारा, औषधपुरवठा सांभाळणारा असेच काहीसे फार्मासिस्टच्या कामाचे स्वरूप राहिले. राज्यकर्ते, इतर आरोग्य व्यावसायिक, समाज यांना फार्मासिस्टची नेमकी ओळख नाही. इतके कशाला, स्वत: फार्मासिस्टना त्यांच्या क्षमतांची किंवा त्यांच्या रुग्णकेंद्री भूमिकेची जाणीव अलीकडेच होऊ लागली आणि या परिस्थितीला जबाबदार सर्व संबंधित घटकच आहेत. शिक्षण, कायदे अंमलबजावणी, धोरणे, दूरदृष्टी, राजकीय इच्छाशक्ती, आरोग्य साक्षरता या व अशा अनेक आघाड्यांवर आपण कमी पडतो. व्यवसायाचे धंदेवाईक स्वरूप राहिले व रुग्ण केंद्रबिंदू न राहता औषध एक विक्रीयोग्य वस्तू याभोवतीच व्यवसायाची रचना झाली. त्यामुळे औषधांच्या विक्री-खेरीज फार्मासिस्टने अधिक काही करावे, करू शकतो हे विचार अगदी गेल्या काही वर्षांपर्यंत पुढेच आले नाहीत. काही राज्यांमध्ये तर अनेक दुकानांमध्ये व काही रुग्णालयांमध्येही फार्मासिस्टच उपस्थित नसतो. अशा ठिकाणी रुग्णाभिमुख सेवा, समुपदेशन फारच दूरची व अशक्यप्राय बाब आहे. महाराष्ट्रात त्या मानाने तुलनेने स्थिती निश्चितच बरी आहे. अशा सर्व परिस्थितीतही जेव्हा जेव्हा फार्मासिस्टना काही सामाजिक उपक्रमांसाठी आवाहन करण्यात येते तेव्हा लक्षणीय संख्येने फार्मासिस्ट पुढे येतात, ही कौतुकास्पद बाब आहे. क्षयरोगाच्या राष्ट्रीय कार्यक्रमात सहभागी होऊन टीबी रुग्णांना 'डॉट्स'ची मोफत औषधे पुरवणे, रोगनिदान होण्यास मदत करते, जनजागृती अशी कामे दुकानाचा रोजचा व्याप सांभाळत आर्थिक मोबदल्याची अपेक्षा न करता सामाजिक बांधिलकीतून हे कार्य फार्मासिस्ट आनंदाने व निष्ठेने करत आहेत. मोफत रक्तदान चाचणी, तंबाखू व्यसनमुक्ती, आरोग्य शिबिरे भरवणे अशीही काही रुग्णोपयोगी सेवा देण्याचा काही फार्मासिस्टचा सातत्याने प्रयत्न असतो. पण अशा 'परिवर्तित' फार्मासिस्टची संख्या सध्या तरी खूप कमी आहे व प्रवाहापेक्षा वेगळे काही करताना त्यांची अवस्था अनेकदा 'त्रिशंकू'सारखी होते. हॉस्पिटलमधील काही फार्मासिस्टही नवे काही शिकण्यासाठी धडपडत असतात, पण त्यासाठी पोषक अशा सुविधा व धोरणे फारशी नाहीत.


'फार्मसी कौन्सिल ऑफ इंडिया' ही संस्था फार्मसी व्यवसाय व शिक्षणावर नियंत्रण ठेवते. कौन्सिलतर्फे जानेवारी २०१५ मध्ये 'फार्मसी प्रॅक्टिस रेग्युलेशन्स' देशात प्रथमच जारी केले आहेत. यात कम्युनिटी फार्मासिस्ट (औषध दुकानातील फार्मासिस्ट) व हॉस्पिटल फार्मासिस्टच्या जबाबदाऱ्या व भूमिका याविषयी सविस्तर विवेचन आहे. फार्मासिस्टने करावयाच्या रुग्णाभिमुख भूमिकेला भारतात प्रथमच या नियमनामुळे एक कायदेशीर अधिष्ठान लाभले आहे व रुग्ण हा फार्मसीचा केंद्रबिंदू असावा या जागतिक विचारास भारतातही चालना मिळाली आहे. अर्थात, या विचारास मूर्त स्वरूप येण्यासाठी खूप मोठा पल्ला आपणास गाठावयाचा आहे.

### फार्मासिस्ट : आता काळाची गरज

एक जरूर नमूद करावेसे वाटते, केवळ परदेशात फार्मसी व्यवसायाचे स्वरूप वेगळे आहे व म्हणून आपल्याकडेही तसे असावे हा विचार येथे खचितच नाही. परदेशातील फार्मसीचे प्रारूप जसेच्या तसे आपल्या इथे शक्य होणारही नाही. पण आज भारतातील सामाजिक आरोग्याची स्थिती पाहिली तर फार्मासिस्टच्या भूमिकेला प्रचंड वाव आहे, नव्हे ती आता काळाची गरज आहे. क्षयरोगाचे जगातील २५ टक्के ओझे आपल्या शिरावर आहे. मधुमेहाची आपण राजधानी आहोत. जगातील प्रत्येक सहावा मधुमेही भारतीय आहे. मनोविकार, वेगवेगळे साथीचे आजार, सांधेजन्य विकार सातत्याने वाढत आहेत. वृद्धांची संख्या आज १० कोटींहून अधिक आहे व २०५० साली साधारण २० टक्के भारतीय हे वृद्ध असतील. एकंदर हे सर्व आरोग्यव्यवस्थेचे प्रश्न न राहता ते सामाजिक प्रश्नच आहेत. औषधांचा खप प्रचंड प्रमाणावर वाढत आहे. औषधांचा अतिवापर, कमी वापर वा चुकीचा वापर यामुळे आजारपणातील समस्या अधिकाधिक गुंतागुंतीच्या होत आहेत. रुग्णांना औषधविषयक मार्गदर्शनासाठी फार्मासिस्टची व त्याच्या औषधतज्ज्ञ भूमिकेची नितांत गरज आहे. केवळ औषध साक्षरतेसाठी नव्हे, तर इतरही सर्व आजारांमध्ये समुपदेशन, रोगनिदान, जनजागृती यांसाठी फार्मासिस्टच्या कामाला भलताच मोठा वाव आहे.

## सुपरस्टार महेश बाबूने डेन्व्हर ऑटोग्राफ एमबी कलेक्शन केले सादर

**मुंबई : हॅलो प्रभात**




भारताचा प्रतिष्ठित मेन्स फ्रॅगरन्स ब्रँड डेन्व्हरने सुपरस्टार महेश बाबूशी सहयोग करून ऑटोग्राफ एमबी कलेक्शनचा प्रचार करण्यासाठी एक ब्रँड फिल्म लॉन्च केली आहे. ऑटोग्राफ एमबी कलेक्शन ही एक लक्झरी यू डी पर्फ्यूम्सची श्रेणी आहे, ज्यामध्ये महेश बाबूची अनोखी स्टाइल आणि वृत्ती तसेच या प्रतिष्ठित स्टारचा सुसंस्कृतपणा झळकतो. आपल्या भावपूर्ण आवाजात महेश बाबू या पर्फ्यूम श्रेणीचा परिचय आपल्याला करून देतो आणि एक सुगंधी अनुभव खुला करतो.

## अग्निकुल कॉसमॉसकडून 'ॲडिटीव्ह मॅन्युफॅक्चरिंग' प्रकल्प सुरु

**मुंबई : हॅलो प्रभात**

अवकाश तंत्रज्ञान क्षेत्रात आघाडीवर असलेल्या अग्निकुल कॉसमॉस कंपनीने आज भारतातील पहिल्या अत्याधुनिक 'ॲडिटीव्ह मॅन्युफॅक्चरिंग' सुविधा कार्यान्वित केल्याची घोषणा केली. ही सुविधा केवळ रॉकेट व एअरोस्पेस तंत्रज्ञानासाठी समर्पित असून, यात डिझाइन, सिम्युलेशन, प्रिंटिंग, पोस्ट-प्रोसेसिंग आणि फिनिशिंग यांचा समावेश असलेली एकात्मिक व्यवस्था निर्माण करण्यात आली आहे. यामुळे उत्पादकता, दर्जा, आणि सप्लाय चेनची स्थिरता वाढवता येणार असून, अवकाश क्षेत्रातील उत्पादन खर्च ५० टक्क्यांनी घटवण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

## आयुर्वेद दिनानिमित्त शिबिरांचे आयोजन

**मुंबई : हॅलो प्रभात**

डाबर इंडिया लिमिटेडने राष्ट्रीय आयुर्वेद दिनानिमित्त देशभर १५३ मोफत आरोग्य शिबिरे आयोजित करून आरोग्याबाबतची आपली जबाबदारी प्रगल्भतेने सादर केली. हा उपक्रम आयुर्वेदाचे फायदे अधोरेखित करण्यासाठी अलीकडेच आयुर्वेद दिनाची तारीख निश्चित करणाऱ्या आयुष मंत्रालयाच्या सहकार्याने राबवण्यात आला. या उपक्रमाद्वारे हजारो लोकांना मोफत सल्ला आणि आरोग्य तपासणी प्रदान करण्यात आली.

## PURE EV सांगलीत दाखल ईव्ही क्रांतीला नवी चालना

**सांगली : हॅलो प्रभात**




भारतातील आघाडीच्या इलेक्ट्रिक दुचाकी उत्पादकांपैकी एक असलेल्या PUR E EV ने आज सांगलीमध्ये आपल्या नवीन शोरूमचे भव्य उद्घाटन केले. ही विस्तार योजना दक्षिण भारतात PURE ची उपस्थिती मजबूत करण्याच्या मिशनमध्ये एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे. हे नवीन शोरूम सांगली-मिरज रोड, न्यू हनुमान रेस्टॉरंट जवळ येथे स्थित असून, येथे ePluto 7G Max, eTryst X यांसारख्या लोकप्रिय इलेक्ट्रिक दुचाकींची संपूर्ण श्रेणी उपलब्ध असणार आहे. सांगलीतील नागरिकांसाठी PURE EV एक अद्वितीय आणि पर्यावरणपूरक वाहन चालविण्याचा अनुभव घेऊन येत आहे.

## 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन २०२५' चे आयोजन

**पुणे : हॅलो प्रभात**

अंमली पदार्थांविरोधात एकत्रितपणे लढा देण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून यंदाची बहुचर्चित 'आपलं पुणे' मॅरेथॉन जागतिक स्वरूपात झळकणार आहे.

पुण्याच्या अद्वितीय मॅरेथॉन परंपरेला पुढे नेण्यासाठी 'पुणे वर्ल्ड मॅरेथॉन २०२५' ही स्पर्धा १२ ऑक्टोबर रोजी रविवारी पहाटे चारपासून (प्रत्येक गटानुसार) श्री शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथून सुरू होणार आहे.

## बापमाणुस... स्व.पत्रकार राजेंद्र पाटील

# 'प्रकाशरूपी दीपस्तंभ विझला'

**शिराळा : नारायण घोडे - पाटील**



नेर्ले (ता.वाळवा) येथील स्व.पत्रकार राजेंद्र पाटील गावातील एक धाडसी आणि सामाजिक जाणिव असणारे 'बाप माणूस' असणारं व्यक्तिमत्व दोन दिवसापूर्वी हरपलं. आणि सगळेच पोरके झाले. राजेंद्र पाटील ह्या नावातच ताकद आणि दरारा होता.दृढ निश्चयी,करारी बाणा आयुष्यभर जपला आणि मरेपर्यंत स्वाभिमान बाळगला.हेच त्यांच्या ठायी असलेले गुण होते.

राजेंद्र पाटील नावाचं एक महत्त्वकांक्षी वादळ २३ सप्टेंबर २०२५ ला पावणे चारच्या दरम्यान शांत झालं.जगाला प्रकाश देणाऱ्या मावळत्या सुर्याबरोबर अनेक युवकांना प्रेरणा देणारा सूर्य अस्ताला गेला कधीही पुन्हा ना उगवण्यासाठी.

कासेगाव शिक्षण संस्थेत ग्रंथपाल या पदावर त्यांनी प्रामाणिक आणि अविरत आजारी असेपर्यंत सेवा केली. राज्याच्या ग्रंथपाल संघटनेत काम करताना राज्यस्तरीय अनेक ग्रंथपाल यांचे संसार उभे केले.शेती वत्सल असणारा हा माणूस कधीच थकला नाही आणि संकटापुढे झुकला ही नाही.दै पुढारी मध्ये पत्रकार असल्यामुळे अनेक राजकीय नेत्यांचा त्यांचा संपर्क आला. यामुळे राजेंद्र पाटील हे व्यक्तिमत्व सर्व परिचित होते. ग्रामीण पत्रकार संघटनेचा कणा म्हणजे राजू दादा होते.नेर्ले गावातील विविध समस्यांवरती निर्भीडपणे लेखन करणारे राजेंद्र पाटील होते. पत्रकार असो किंवा सर्वसामान्य जनता त्यांनी नेहमी मदतीसाठी धावून पुढे गेले यामुळे त्यांना समाजात वेगळे स्थान होते.

सामान्य माणसाबरोबर राजेंद्र पाटील या नावाची नाळ जोडली गेली होती.एखाद्याच्या संकट काळात धावून जाणारे त्याला धीर देणे. त्याच्या पाठीशी खंबीरपणे शेवटच्या क्षणापर्यंत थांबणं. हा त्यांचा स्थाई स्वभाव होता. गेल्या चार-पाच वर्षांपासून त्यांना एका दीर्घ आजाराने गाठलं प्रत्येक मंगळवार आणि गुरुवारी डायलिसिस करणे जरुरीचं होतं. किडनीचा दोष असल्यामुळे किडनी बसवण्यासाठी लवकर मिळाली नाही. फोन केला की कुठे आहे तर डायलिसिस केलंय कुठे जुळणी आहे काय?असा प्रति प्रश्न यायचा. पत्रकारांवर जीवापाड त्यांचं प्रेम होतं.

त्यांना जगण्याची तीव्र इच्छा होती. किडनीसाठी मुंबई पासून कर्नाटक पर्यंत बऱ्याच ठिकाणी त्यांचा मुलगा रोहित, सिद्धू, पत्नी,मुलगी आणि रोहितचे मामा,चुलते,चुलत भाऊ आणि जवळच्या नात्यातील लोकांनी खूप प्रयत्न केले.कुटुंबीय पाहुणे मित्र परिवार यांच्या प्रयत्नांना यश आले.आणि गेल्या आठवड्यात किडनी उपलब्ध झाली.परंतु गुडघ्याला इन्फेक्शन असल्यामुळे इन्फेक्शन कमी झाल्यानंतर आपण किडनी प्रत्यारोपण करू असे डॉक्टर यांनी सांगितले.राजेंद्र पाटील या धक्क्यातून त्यांना स्वतःला सावरणे फार जिकिरीचे आणि मनाला अत्यंत वाईट वाटले. स्वतःच्या सहीने आपल्या नंबरची आलेली किडनी दुसऱ्याला देऊन या देवमाणसाने जगाचा निरोप घेतला.

नवे विचार...नवी सुरुवात
दैनिक हॅलो प्रभात

■ दैनिक **हॅलो प्रभात** हे पत्रक, मुद्रक शशिकांत बापूसाहेब कुंभोजकर यांनी प्रकाशक व मालक गणेश बंडा पाटील यांच्याकरिता, मे. कुंभोजकर ऑफसेट प्रिंटर्स, २६२ महावीरनगर, सांगली - ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथे छापून **दैनिक हॅलो प्रभात**, कार्यालय, ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली- ४१६ ४१६ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले.
■ **सांगली मुख्य कार्यालय** : ब्लॉक नं. 'ए', कल्पकुंज विहार, एस.टी. स्टँड रोड, सांगली. ■ **पुणे कार्यालय** : १६७७, सदाशिव पेठ, अमित रेसिडेन्सी, एस.पी. कॉलेज जवळ, पुणे-४११०३०
■ **सांगली शहर संपर्क** : ९०२१६५१९७६ ■ **कोल्हापूर कार्यालय** : एस ९४६, GF-7, गुलमर्ग अपार्टमेंट, सरनाईक कॉलनी, शिवाजी पेठ, कोल्हापूर-४१६००२
■ या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. (सांगली न्यायक्षेत्र)

■ निवासी संपादक : संजीव शाळगावकर ■ मुख्य संपादक : गणेश पाटील-सावर्डेकर



## नव कृष्णा व्हॅली स्कूलचे फुटबॉल स्पर्धेत यश



**कुपवाड : हॅलो प्रभात**

सातारा जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयामार्फत दि.१६ सप्टेंबर २०२५ रोजी सातारा येथील शिवाजी स्टेडियमवर विभागीय स्तरीय १९ वर्षांखालील शालेय फुटबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

या स्पर्धेत कोल्हापूर विभागातील पाच जिल्ह्यांमधील एकूण १० संघांनी सहभाग नोंदविला होता. त्यामध्ये नव कृष्णा व्हॅली स्कूल जुनिअर कॉलेजच्या खेळाडूंनी उत्कृष्ट खेळ सादर करून तृतीय क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल संस्थेचे संस्थापक प्रवीण लुंकड, डायरेक्टर सौ.संगीता पागनीस, उपप्राचार्य प्रशांत चव्हाण, स्पोर्ट्स इंचार्ज विनायक जोशी, क्रीडा शिक्षक सुशांत सूर्यवंशी, फुटबॉल प्रशिक्षक अशरफ शेख यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे नव कृष्णा व्हॅली स्कूलच्या खेळाडूंचे सर्वत्र कौतुक होत आहे.

## शोभायात्रा कलाप्रकारात राजे रामराव महाविद्यालयाचा डंका



### द्वितीय क्रमांकाची कामगिरी

**जत : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर आयोजित शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय, मिरज येथे संपन्न झालेल्या मध्यवर्ती युवक महोत्सवामध्ये राजे रामराव महाविद्यालय, जत येथील विद्यार्थ्यांनी कलाक्षेत्रात आपली छाप पाडत युवक महोत्सवामध्ये नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या शोभायात्रा या कलाप्रकारामध्ये द्वितीय क्रमांक पटकावला. या यशामुळे महाविद्यालयाने विद्यापीठ स्तरावर पुन्हा एकदा आपली ओळख दृढ केली आहे.

या यशस्वी कामगिरीबद्दल शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी.टी. शिर्के, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, अर्थसचिव प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. सुरेश पाटील यांनी विद्यार्थ्यांचे व सांस्कृतिक विभागातील प्राध्यापकांचे मनःपूर्वक अभिनंदन करून भविष्यात अधिक मोठ्या प्रमाणावर यश मिळवावे, अशा शुभेच्छा दिल्या.

शोभायात्रा कलाप्रकारात विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध सांस्कृतिक झलकांनी प्रेक्षकांचे लक्ष वेधून घेतले. कलाकृतीतील सर्जनशीलता, सादरीकरणातील प्रामाणिकता आणि टीमवर्कची भावना यामुळे महाविद्यालयाला द्वितीय क्रमांकाचा बहुमान मिळाला.

या यशाबद्दल महाविद्यालयाच्या वतीने सुद्धा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ. सुरेश पाटील यांच्या हस्ते विद्यार्थ्यांनी मिळवलेल्या यशाबद्दल विद्यार्थ्यांबरोबरच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे सांस्कृतिक विभागाचे विभागप्रमुख डॉ. सतीशकुमार पडोळकर, प्रा.रेश्मा लवटे, प्रा. रोहिणी शिंदे, प्रा.विशाल गोडबोले, प्रा. वैशाली मदने तसेच कोरिओग्राफर सूरज मणेर यांचाही सत्कार महाविद्यालयाच्या वतीने करण्यात आला.या कलाप्रकारामध्ये प्रथमेश बंडगर, अनुराधा शिवशरण, सिद्धी शर्मा, ज्योती मोरे, प्रतीक्षा बंडगर, स्नेहल खर्जे, रेणुका मोरे, वैजयंती शिंदे, ऐश्वर्या माने, साक्षी माने, सरस्वती बामणे, प्रियदर्शनी मिरजे, ऋतुजा केसकर इत्यादी विद्यार्थी सहभागी होते. या यशामुळे महाविद्यालयात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विद्यार्थ्यांमध्ये उत्साह आणि आत्मविश्वास वृद्धिंगत झाला आहे.

## कसबा बावड्यातील सर्वच प्रलंबित प्रश्न मार्गी लावू : आ.राजेश क्षीरसागर

### दबावशाहीला झिडकारून बावडावासियांनी कार्यकर्त्याला पाठबळ दिले

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**



कसबा बावडा आणि शिवसेनेचे अतूट नाते असून, कसबा बावडा शिवसेनेचा बालेकिल्ला आहे. कसबा बावड्यातील जतना नेहमीच माझ्या बाजूने उभी राहिली असून त्याची मला जान आहे. त्यामुळेच कसबा बावड्याच्या विकासास नेहमीच प्राधान्य दिले आहे. राजाराम बंधाऱ्याच्या पर्यायी पुलाकरिता निधी, राजाराम बंधारा ते कसबा बावडा रोड करिता निधी, तिरंगा लाईट लावणे, हनुमान तलावाचे सुशोभिकरण, यासह बावड्यातील प्रमुख मार्ग आणि अंतर्गत कॉलनी, गल्ल्यामधील रस्त्याची कामे, पाणद्यांचा विकास आदि कामांसाठी आजतागायत कोट्यावधी रुपयांच्यावर निधी वितरीत केला आहे. काम करणाऱ्या कार्यकर्त्यांची जाण कसबा बावडावासियांना असून, विधानसभा निवडणुकीत दबावशाहीला झिडकारून बावडावासियांनी माझ्यासारख्या कार्यकर्त्याला पाठबळ दिले. त्यामुळे कसबा बावड्याच्या विकासाकरिता सदैव कटिबद्ध असल्याचे सांगत आ.राजेश क्षीरसागर कसबा बावडावासियांसमोर नतमस्तक झाले.

कसबा बावडा येथी श्री कॉलनी परिसरातील विकास कामे मार्गी लावल्याबद्दल परिसरातील नागरिकांच्यावतीने आमदार राजेश क्षीरसागर यांचा जाहीर सत्कार करण्यात आला. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी शिवसेना शहर समन्वयक सुनील जाधव, तोरणागड कार्यालय प्रमुख कृष्णा लोंढे,आदर्श जाधव,उपशहर प्रमुख जय लाड,विभाग प्रमुख रणजित शिंदे,एकनाथ खोत,किशोर घाटगे, अण्णासाहेब पिंगळे, ड. संजय घाटगे, काका सुनगार, धीरज पाटील, दादा कांबळे, मोहन शिंदे, विश्वनाथ आंबी, अभी मोगणी यांच्यासह भागातील मान्यवर, नागरिक, शिवसैनिक उपस्थित होते.

## हुपरी येथे श्री दुर्गामाता दौडचे उत्साहात स्वागत

**हुपरी : हॅलो प्रभात**



येथील छत्रपती श्री शिवाजीनगर येथे श्री संघर्ष तरूण मंडळ यांच्या वतीने श्री दुर्गामाता दौडचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

मंगळवार दि.२३ रोजी पहाटे ६ वा. श्री दुर्गामाता दौडचे स्वागत श्री संघर्ष तरूण मंडळाच्या वतीने उत्साहात व भक्तीमय वातावरणात करण्यात आले. या मंडळाचा 'डॉल्बीच्या युगात संस्कृती जपणारे मंडळ' असा संदेश समाजाला देत 'सुरुवात नवी,जुन्या संस्कारांची' या संकल्पने अंतर्गत दौडचे स्वागत करण्याचा मनोदय असतो.

मंडळाच्या वतीने श्री दुर्गामाता दौडचे स्वागत ऐतिहासिक व भक्तीमय वातावरणात करण्यात आले. यामध्ये छत्रपती श्री शिवाजी महाराजांची व धर्मवीर छत्रपती संभाजीराजे यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून सुशोभीत करण्यात आले होते. तसेच देवदेवतांच्या रुपात वेशभूषा करून भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. यामध्ये धनुर्धारी प्रभू श्रीराम, गोपिकांसमवेत प्रभू श्रीकृष्ण,आई अंबाबाई,श्री जोतिबा, श्री खंडोबा, श्री महादेव, संत श्री बाळूमामा, वारकरी सांप्रदाय तसेच श्री दत्त सांप्रदाय या सर्व देवतांची, सांप्रदायांची वेशभूषा करून भक्तीमय वातावरण निर्माण केले. असा हा अनन्यसाधारण सोहळा हुपरीकरांनी अनुभवला तसेच आपल्या गोमातेच्या रक्षणाचे व गोहत्या बंदीचे कायदे लवकरच शासनाने करावीत असे घोषणांच्या माध्यमांतून मंडळाच्या कार्यकर्त्यांनी संदेश दिला. यावेळी संघर्ष तरूण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश घाटगे, उपाध्यक्ष किरण जाधव व सर्व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विवेकानंद कॉलेजमध्ये हिंदी दिवस उत्साहात

**कोल्हापूर : हॅलो प्रभात**

विवेकानंद कॉलेजच्या हिंदी विभागातर्फे आयोजित हिंदी सप्ताहाचा समारोप उत्साहात झाला. हिंदी भाषा-साहित्य माणसाला जगण्याची प्रेरणा देते, व्यक्तिमत्व घडवते असे प्रतिपादन विजयसिंह यादव कॉलेजचे हिंदी विभागप्रमुख प्रा.(डॉ.) नाजिम शेख यांनी केले. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर.आर. कुंभार होते. हिंदी सप्ताहात निबंध, काव्यवाचन, समीक्षा लेखन व विज्ञापन अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. यात सानिका पाटील, नजिया नदाफ, महेक मुलाणी, जिनत शेख, रिफा मुल्ला, सिफा मुल्ला, देवेंद्र सूर्यवंशी, स्वाती हिंगोले, अलताफ पटेल, दिपाली खुटाले, तृप्ती सावंत, लक्ष्मी सुतार यांना विजेतेपदे मिळाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.आरिफ महात यांनी केले; आभार डॉ.दीपक तुपे यांनी मानले; सूत्रसंचालन नाझिया नदाफ हिने केले. कनिष्ठ हिंदी विभागप्रमुख प्रा. विश्वंभर कुलकर्णी, विद्यार्थी-विद्यार्थिनीमोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ज्योत परिक्रमेत महिलांचा सहभाग ; परिक्रमेला मोठा प्रतिसाद

**जयसिंगपूर : हॅलो प्रभात**



जेसीबीच्या सहाय्याने फुलांची उधळण, ज्योत परिक्रमेत महिलांचा सहभाग, फटाक्यांची आतषबाजी, हलगीचा कडकडाट आणि जय भीमच्या जयघोषात मंगळवारी कोंडीग्रे, यड्राव, जांभळी, हरोली, शिरढोण, टाकवडे, इचलकरंजी टाकवडे वेस आणि शिरदवाड येथे भीमज्योत परिक्रमा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. भीम ज्योत परिक्रमेच्या तिसऱ्या दिवशी शिरोळ तालुक्यात मोठा प्रतिसाद मिळाला. यड्राव येथे भीमसैनिकांनी जेसीबीच्या सहाय्याने फुलांची उधळण करून परिक्रमेचे आगळे -वेगळे स्वागत केले. इतर गावात हलगीच्या कडकडाटात, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि फुलांच्या उधळणीतून भीमज्योतीचे स्वागत करण्यात आले. गावागावांत महिलांनी सामूहिक ज्योत परिक्रमा काढत या ऐतिहासिक क्षणात सहभाग नोंदवला. तरुणाईने सजवलेल्या वाहनफेऱ्या, रांगोळ्या, यामुळे संपूर्ण परिसर उत्सवमय झाला होता. जय भीमच्या घोषणा आणि हलगीच्या ठेक्यांवर भीमसैनिकांच्या टाळ्या, घोषणांनी गावागावांतून वातावरण दणाणून गेले.

गेल्या पन्नास वर्षांपासून शिरोळ तालुक्याचे स्वप्न असलेला डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा अखेर साकार होत असल्याचा आनंद नागरिकांच्या चेहऱ्यावर उमटला होता. परिक्रमेच्या माध्यमातून ऐक्याची भावना दृढ होत असून २८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४ वाजता जयसिंगपूर शहरात होणाऱ्या पुतळ्याच्या भव्य आगमन सोहळ्याची उत्सुकता वाढली आहे. तिसऱ्या दिवशीची भीमज्योत परिक्रमा शिरोळ तालुक्यात सामाजिक परिवर्तन, उत्साह आणि बंधुतेचे आगळेवेगळे प्रतीक ठरले. याप्रसंगी भीमसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रोहयो मधील जुनी अपूर्ण कामे आठ दिवसात पूर्ण करा : जिल्हाधिकारी

**सातारा : हॅलो प्रभात**



महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील ग्रामीण भागातील जुनी कामे अपूर्ण आहेत. ही कामे संबंधित यंत्रणांनी येत्या आठ दिवसात पूर्ण करावीत, तसा अहवाल सादर करावा, असे निर्देश जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयातील परिषद सभागृहात जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील कामांचा आढावा घेतला. या आढावा बैठकीला उपजिल्हाधिकारी (रोहयो) वृषाली मोरे, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राहूल देसाई यांच्यासह दूरदृष्य प्रणालीद्वारे जिल्ह्यातील सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी उपस्थित होते.

संबंधित यंत्रणांनी महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेतील जुन्या कामांची यादी तयार करुन ती कामे पूर्ण करावी, असे निर्देश देऊन जिल्हाधिकारी श्री.पाटील म्हणाले, जुनी कामे पूर्ण केल्यानंतरच नवीन कामे हाती घ्यावीत. जुनी कामे का प्रलंबित राहिली याचा सविस्तर अहवाल सादर करावा. तसेच झालेल्या कामांचे सोशल ऑडीट तात्काळ करावे, अशा सूचनाही जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केल्या. सेवा पंधरवडा जिल्ह्यात येत्या २ ऑक्टोंबरपर्यंत राबविण्यात येणार आहे. ज्या पाणंद रस्त्यांचा शेतकऱ्यांनी मंजुरी दिली तसेच रस्त्याला मान्यता मिळाली आहेत,असे रस्त्यांची कामे सेवा पंधरवड्यात पूर्ण करावीत. तसेच महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत जास्तीत जास्त क्षेत्र बांबू लागवडी खाली कसे येईल, यासाठी ग्रामपंचायत विभाग, सामाजिक वनीकरण व कृषी विभागाने प्रयत्न करावे, अशाही सूचना जिल्हाधिकारी संतोष पाटील यांनी केल्या.

## नवरात्र उत्सवानिमित्त विठ्ठल रुक्मिणीला आकर्षक पोशाख

**पंढरपूर : नागेश ओहाळ**



घटस्थापना शारदीय नवरात्र उत्सवानिमित्त श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात आकर्षक फुलांची सजावट करण्यात आली आहे. त्याच बरोबर श्री विठ्ठल व माता रुक्मिणीला पारंपरिक पोशाखासह अलंकार परिधान करण्यात आले असल्याची माहिती मंदिर समितीचे प्रभारी व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत यांनी दिली.

मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर, कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, प्र. व्यवस्थापक पृथ्वीराज राऊत, लेखा अधिकारी मुकेश अनेचा यांच्या मार्गदर्शनाखाली नवरात्र उत्सवाची तयारी करण्यात आली आहे. पारंपरिक कार्यक्रमांसह महिला भजनी मंडळाच्या भंजन सेवेने मंदिरात घटस्थापनेपासून नवरात्र महोत्सवात सुरूवात झाली आहे.

रूक्मिणीमातेस सोन्याचा मुकुट, वाक्या जोड, तोडे जोड, तानवड जोड, चिंचपेटी तांबडी, जवमणी पदक, जवेच्या माळा, लक्ष्मीहार, मोहरांची माळ, पुतळ्यांची माळ,हायकोल, सरी, कंबरपट्टा इत्यादी प्रकारचे अलंकार परिधान करण्यात आले आहेत. तसेच श्री विठ्ठलासदेखील नेहमी प्रमाणे सोने मुकुट, कौस्तुक मणी, मोत्याचा तुरा, नाम, दंडपेठ्या मोठा जोड, हिऱ्यांचा कंगन जोड, एक पदरी मोत्याचीं कंठी , लहान-मोठा शिरपेच, मत्सजोड, हायकोल, मोहन माळ, पुतळ्यांची व माहेरांची माळ, एकदाणी, तोडेजोड, तुळशी माळ, हायकोल इत्यादी पारंपरिक अलंकार परिधान करण्यात आले आहेत.

## संजय माध्यमिक विद्यालयाच्या विद्यार्थीनींची कामगिरी

**शाहुवाडी : हॅलो प्रभात**



शाहूवाडी तालुकास्तरीय शासकीय योगासन स्पर्धेत संजय माध्यमिक विद्यालय, नांदगावच्या विद्यार्थीनींनी चमकदार कामगिरी करत प्रशालेचा झेंडा उंचावला. सरूड येथे झालेल्या या स्पर्धेत १४ वर्षांखालील गटात संजय विद्यालयातील मुलींनी तीन प्रकारांमध्ये व्दितीय क्रमांक पटकावला.योगासन आर्टिस्टिक सिंगल प्रकारात श्रेया सागर पाटील हिने व्दितीय क्रमांक मिळवला. आर्टिस्टिक पेअर डबल प्रकारात आरोही विठ्ठल विचारे व अक्षरा सुनील कांबळे यांनी व्दितीय क्रमांक पटकावला. तर रिदॅमिक पेअर प्रकारात अस्मिता सागर पाटील व श्रेया सागर पाटील यांनीही व्दितीय क्रमांक मिळवत प्रशालेचा गौरव वाढवला. या यशामागे किसान शिक्षण प्रसारक मंडळ कोतोलीचे अध्यक्ष डी.जी.पाटील, मुख्याध्यापक पी.एम.पाटील, क्रीडा शिक्षक संतोष फिरींगे तसेच सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांचे मार्गदर्शन लाभले. या यशामुळे नांदगावच्या विद्यार्थीनींच्या मेहनतीला व कौशल्याला मिळालेला हा बहुमान ठरला असून प्रशालेत आनंदाचे वातावरण आहे.

## 'स्वस्थ नारी-सशक्तपरिवार' अभियानांत ५१८ नागरिकांची तपासणी : डॉ.जयदीप रेवडेकर

**कोतोली : हॅलो प्रभात**



प्राथमिक आरोग्य केंद्र, कोतोली यांच्या वतीने 'स्वस्थ नारी - सशक्त परिवार' अभियानांतर्गत जेष्ठ नागरिक तसेच महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे उद्घाटन उपसरपंच अजित पाटील यांच्या हस्ते करण्यात आले यावेळी ५१८ नागरिकांची तपासणी केली. शिबिरात हिमोग्लोबिन, डोळे, दात व स्त्रीरोग तज्ज्ञांकडून महिलांची तपासणी करण्यात आली. यावेळी निरोगी जीवनशैली, पोषण, आरोग्य सेवा, जलजन्य व किटकजन्य रोगांचे प्रतिबंध तसेच विविध आजारांबाबत मार्गदर्शनही करण्यात आले.

या शिबिरासाठी डॉ.जयदीप रेवडेकर, डॉ.कैलास गीते, डॉ.विजय पाटील डॉ.संगीता गराडे यांनी महत्त्वपूर्ण सेवा दिली. याशिवाय स्नेहल कुंभार, उमाजी बर्गे, उषा खोडके, संगीता हजारे, तेजा यादव, मेघा पाटील, उमा लाखोळे, शिवानी मदाळे, कविता पाटील, के. एस. पाटील, मृणाल बचाटे, संगीता कोकितकर, संगीता पाटील, दीपाली जाधव, प्रगती कांबळे, संदिप पाटील, अर्जुन पाटील, रंगराव नरके, युवराज जरग, अभिजित जाधव, स्मिता कुलकर्णी, मेघा पाटील, गक्त पर्वतक, आशा स्वयंसेविका गराडे मामा, शांता मावशी, अर्धवेळ परिचर व आरोग्य कर्मचारी यांनी सक्रिय सहभाग नोंदविला. या आरोग्य शिबिराला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. सर्वांच्या सहकार्यामुळे हे शिबिर अत्यंत यशस्वी ठरले.

## नमो नेत्र मोतीबिंदू अभियान शिबिर संपन्न



**पेठवडगाव : हॅलो प्रभात**

आयुष्यमान आरोग्य मंदिर, सावर्डे अंतर्गत उपकेंद्र सावर्डे, डॉ.डी. वाय पाटील हॉस्पिटल, कोल्हापूर यांच्या संयुक्त सहकार्याने मोफत नमो नेत्र मोतीबिंदू अभियान शिबिर सावर्डे येथे पार पडले. या कार्यक्रमाला सावर्डे गावचे उपसरपंच द्रौपदी कांबळे, ग्रामपंचायत सदस्य अजित पाटील, सावर्डे प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.श्रेयस चौगुले,आरोग्य सहाय्यक सचिन चव्हाण, आरोग्य सहाय्यक गावित, आरोग्य सेवक निलेश कुंभार, अशा सेविका वैशाली कांबळे, डी.वाय.पाटील हॉस्पिटल सेविका टीम तसेच गावातील माता-भगिनी व ग्रामस्थ उपस्थित होते.

## गलाई बांधवांसाठी शिवप्रताप मल्टी स्टेटचा मोलाचा हातभार

### XRF सोने तपासणी मशीनचे वितरण

**विटा : हॅलो प्रभात**



येथील प्रतिथयश शिवप्रताप मल्टी स्टेट नागरी को-ऑप.क्रेडिट सोसायटी व आंतरराष्ट्रीय दर्जाची फिशर इंडिया कंपनी यांच्या मध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या करारानुसार देशभरातील गलाई बांधव व सोने व्यावसायिकांना त्यांच्या व्यवसायाच्या वृद्धीसाठी आणि सुरक्षेसाठी अत्याधुनिक दठक्र सोने टंच (तपासणी) मशीन उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. या करारानुसार आज संस्थेचे सभासद असणाऱ्या गलाई बांधवांना या मशीनचे वाटप करण्यात आले.

संस्थेचे संस्थापक स्व. प्रतापशेठ दादा साळुंखे हे स्वतः गलाई व्यावसायिक होते. गलाई बांधवांच्या सहकार्यानेच शिवप्रताप मल्टी स्टेटची भक्कम पायाभरणी झाली. दादांची कायमची इच्छा होती की संस्थेमार्फत गलाई बांधवांना मदत व्हावी व त्यांच्या व्यवसायासाठी आवश्यक तांत्रिक साधने उपलब्ध व्हावीत. आजच्या या उपक्रमामुळे त्यांची दूरदृष्टी प्रत्यक्षात उतरली असून संस्थेच्या इतिहासात एक महत्त्वपूर्ण पान लिहिले गेले आहे. कार्यक्रमाच्या प्रसंगी संस्थेचे चेअरमन शेखर साळुंखे व कार्यकारी संचालक ॲड विठ्ठल साळुंखे यांनी गलाई बांधव व सोने व्यावसायिकांना जास्तीत जास्त या योजनेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. आजच्या आधुनिक काळानुसार सोन्याची शुद्धता तपासणे आणि ग्राहकांना विश्वासार्ह सेवा देणे ही प्रत्येक व्यावसायिकाची जबाबदारी आहे. या मशीनमुळे गलाई व सोने व्यवसाय अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि विश्वासार्ह होणार असून सभासदांना स्पर्धात्मक ताकद मिळणार आहे. व त्यांचे व्यवसायात यामुळे वाढ होऊन उत्पन्न वाढणार आहे.

यावेळी उपस्थित गलाई बांधवांनीही समाधान व्यक्त करून सांगितले की आजच्या परिस्थितीत ही मशीन व्यवसायासाठी अत्यावश्यक ठरली आहे. शिवप्रताप मल्टी स्टेटने ही सुविधा उपलब्ध करून दिल्यामुळे आमच्या व्यवसायाला नवे बळ मिळाले आहे तसेच ग्राहकांचा विश्वास टिकविण्यास आणि वाढविण्यासाठी ही योजना अत्यंत मोलाची ठरत आहे.

शिवप्रताप मल्टी स्टेट व फिशर इंडिया यांच्या या संयुक्त उपक्रमामुळे गलाई बांधव व सोने व्यावसायिकांना आधुनिक तंत्रज्ञानाची जोड मिळाली असून त्यांचे व्यवसाय अधिक सुरक्षित, पारदर्शक व प्रगतीशील होणार आहेत. या कार्यक्रमास संस्थेचे व्हा.चेअरमन हणमंतराव सपकाळ, कार्यकारी संचालक विठ्ठलराव साळुंखे, सभासद, अधिकारी व गलाई बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सोलापूरच्या मदतीसाठी ५ यांत्रिक बोटी रवाना

**सांगली : हॅलो प्रभात**

सोलापूर जिल्ह्यात अतिवृष्टीच्या तसेच भीमा व सीना नदीला सुरू असलेल्या विसर्गामुळे पूरपरिस्थितीच्या पार्श्वभूमिवर भीमेच्या मदतीला कृष्णा धावली असून सोलापूर जिल्हा प्रशासनाच्या मागणीनुसार सांगली जिल्ह्यातून ५ यांत्रिक बोटी व ४५ लाईफ जॅकेटसह १५ व्यक्तींचे पथक आज जिल्हाधिकारी अशोक काकडे यांच्या उपस्थितीत सोलापूरकडे रवाना झाले. यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. स्नेहल कनिचे, तहसीलदार डॉ. अपर्णा मोरे, लीना खरात, प्रभारी जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकारी विजय ढेरे, रफिक नदाफ, रॉयल कृष्णा बोट स्पोर्ट्स क्लबचे दत्ता पाटील आदि उपस्थित होते.



मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने करमाळा, माढा, मोहोळ, अपर तहसील मंद्रूप, उत्तर सोलापूर या तालुक्याम ध्ये पूरपरिस्थिती निर्माण झाल्याने अतिरीक्त मनुष्यबळ व साहित्याची मागणी सोलापूर जिल्हा प्रशासनाकडून करण्यात आली आहे.

या पार्श्वभूमिवर सांगली जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाकडे उपलब्ध असणाऱ्या साहित्यांपैकी आवश्यक त्या साधन सामुग्रीसह व पाण्याच्या खाली शोध कार्य करण्याच्या क्षमतेसह तैनात करण्यासाठी ५ यांत्रिक बोटी, सोबत १५ व्यक्तींचे पथक व ४५ लाईफ जॅकेट, ५ रिंग उप-लब्ध करून देण्यात आल्या आहेत.

# सांगली-मिरज-कुपवाड महापालिकेची सायकल रॅली संपन्न

**सांगली : हॅलो प्रभात**

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेकडून स्वच्छ सर्वेक्षण २०२५ व म ाझी वसुंधरा अभियान अंतर्गत भव्य सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले. आयुक्त सत्यम गांधी यांच्या मार्गदर्शनाखाली कर्मवीर चौकातून या रॅलीला सुरुवात झाली.




अतिरिक्त आयुक्त राहुल रोकडे आणि उपायुक्त स्मृती पाटील यांच्या उपस्थितीत रॅलीची सुरुवात झाली. प्रारंभी महापालिकेचे ब्रँड ॲम्बेसेडर दीपक चव्हाण यांनी सर्वांना स्वच्छतेची शपथ दिली.

यावेळी वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. वैभव पाटील, क्रीडाधिकारी स्नेहांकिता वरुटे, मुख्य स्वच्छता अधिकारी सचिन सागावकर, पर्यावरण अभियंता अजित गुजराथी, स्वच्छता अधिकारी अतुल आठवले, याकूब मद्रासी, लेखाधिकारी धनंजय जाधव, मालमत्ता अधीक्षक धनंजय हर्षद आदी अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



# शिवप्रसाद फाउंडेशनच्या वतीने आरोग्य शिबीर संपन्न

**नातेपुते : हॅलो प्रभात**

शिवप्रसाद फाउंडेशन व सेवासदन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल मिरज यांच्या संयुक्त विद्यमानेआयोजित मोफत आरोग्य शिबिर व चष्मे वाटप हा कार्यक्रम घेण्यात आला. शिवप्रसाद उद्योग समूहाचे अध्यक्ष शरद मोरे तसेच मा.जि. प. सदस्या ऋतुजा मोरे व म ान्यवरांच्या हस्ते महालक्ष्मीच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रम ांची सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमामध्ये मोफत हृदयरोग तपासणी, मोफत यूरोलॉजी तप-ासणी, मोफत डोळे तपासणी व मोफत चष्मे वाटप, मोफत कॅन्सर तपासणी मोफत रक्त तपासणी, मेंदूचे आजार तपासणी व मोफत शस्त्रक्रिया मनका व मज्जातंतू यासंबंधी, मोफत शस्त्रक्रिया अल्पदरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया. वरील आजारांच्या तपासण्या म ोफत करण्यात आल्या. यावेळी या शिबिराचा ५०० नागरिकांनी लाभ घेतला.

सेवासदन मल्टी स्पेशलिस्ट यांच्यातर्फे लता मोरे यांनी काम काज पाहिले तसेच ऑपरेशनची तपासणी केली. या कार्यक्रम ास अण्णा सूळ, बाजीराव काटकर, किशोर सूळ, शुभम सूळ, यांच्यासह कार्यकर्ते, पदाधिकारी, नागरिक, कर्मचारी, फॉउंडेशनचे कर्मचारी उपस्थित होते.

# राजे रामराव महाविद्यालयात आरोग्यविषयक चर्चासत्र

**जत : हॅलो प्रभात**

येथील राजे रामराव महाविद्यालयात महिला सबलीकरण कक्ष, अंतर्गत तक्रार निवारण कक्ष आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने 'ब्रेकिंग द सायलन्स : मासिक पाळी व पीसीओडी विषयी जनजागृती' या विषयावर एकदिवसीय चर्चासत्र संपन्न झाले.

या चर्चासत्राच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.महादेव करेण्णावर हे होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून भारती विद्यापीठ मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल, सांगली येथील डॉ.सुषमा धोंडे उपस्थित होत्या.

यावेळी विद्यार्थिनींना मार्गदर्शन करताना डॉ.सुषमा धोंडे यांनी मासिक पाळीचे चक्र, पीसीओडी म्हणजे काय, त्याची लक्षणे, त्यावरील उपाय तसेच फास्ट फूडचे दुष्परिणाम याबाबत सखोल मार्गदर्शन केले.



त्याबरोबरच कला, वाणिज्य, विज्ञान आणि बीसीए विभागांतील विद्यार्थिनींवर पीसीओडीविषयी सर्वेक्षण देखील त्यांच्या वैद्यकीय टीममार्फत घेण्यात आले. कार्यक्रमात डॉ.स्नेहल भोसले यांनी पीसीओडीविषयी प्रभावी सादरीकरण केले.

प्रास्ताविक व प्रमुख पाहुण्यांचे स्व-ागत समन्वयक प्रा.डॉ.मधुमती शिंदे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रोहिणी शिंदे यांनी तर आभारप्रदर्शन प्रा.भाग्यश्री माळी यांनी केले. या चर्चासत्रास महाविद्यालयातील सर्व विभागांतील विद्यार्थिनी, प्राध्यापकवर्ग व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# झीलच्या जियाची विभागीय स्पर्धेसाठी निवड

**कुपवाड : हॅलो प्रभात**

जिल्हा क्रीडा संकुल मिरज येथे पार पडलेल्या लॉन टेनिस स्पर्धेत १९ वर्षाखालील मुलींच्या गटामध्ये जिया खत्री हिने तृतीय क्रमांक मिळवला. हीची कोल्हापूर येथे होणाऱ्या विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. या खेळाडूला शाळेचे क्रीडाशिक्षक स्वप्निल कदम यांचे मार्गदर्शन लाभले. संघास शाळ-ेचे क्रीडा प्रमुख अभिनंदन गारे यांचे मार्गदर्शन लाभले. वरील संघाचे झील इंटरनॅशनल स्कूलचे डायरेक्टर संजय महाडिक, शाळेच्या मुख्याध्यापिका मेघ-ाली नरगच्चे, शाळेचे समन्वयक अभय भिलवडे यांनी कौतुक करत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# वेदगंगा कीर्तन महोत्सवाची भक्तिरसात सांगता

**मळगे बुद्रुक : हॅलो प्रभात**

वारकरी परंपरेचे वैशिष्ट्य म्हणजे भक्तिभाव, साधेपणा आणि जीवनाला दिशा देण-ारे विचार. मळगे बुद्रुक येथे नुकताच पार पडलेला वेदगंगा कीर्तन महोत्सव हीच वारकरी परंपरेची साक्ष देऊन गेला. तीन दिवस गाजलेल्या या महोत्स-वाने केवळ हजारों भक्तांचे मनोमन समाधान केले नाही, तर अध्यात्मिक उर्जा, नैतिक मूल्ये आणि समाजजीवनासाठी आवश्यक असलेली समरसता जागवली. १९ ते २१ सप्टेंबर दरम्यान श्री भैरवनाथ मंदिराच्या पवित्र परिसरात आयोजित या कीर्तन महोत्सवाने गावामध्ये भक्तिरसाची अखंड धार वाहती ठेवली.

या महोत्सवाचे आयोजन माजी उपसरपंच दिगंबर बापूसो अस्वले व समस्त वारकरी सांप्रदाय यांच्या वतीने करण्यात आले होते. यावेळी राजे समरजितसिंह घाटगे यांची प्रमुख उपस्थिती होती. ग्रामस्थांचा उत्स्फूर्त सहभाग, भाविकांची गर्दी आणि वातावरणात दरवळणारी भक्तिभावाची सुगंधी झुळूक यामुळे हा महोत्सव सर्वार्थाने अविस्मरणीय ठरला.



ह. भ. प. ॲड. कृष्णा महाराज चवरे यांच्या प्रभावी कीर्तनाने महोत्सवाचा शुभारंभ झाला, तर ह. भ. प. सचिंनद-ादा महाराज पवार यांनी साम ाजिक जाणिवांना धार देत अध्यात्माचा नवा मार्ग दाखव-ला. अखेरच्या दिवशी ह. भ. प. चैतन्य महाराज वाडेकर यांनी संत तुकाराम महाराजांच्या विचारधारेचा आविष्कार घडवत भक्तांना अंतर्मुख केले. कीर्तन ही केवळ धार्मिक परंपरा नसून समाजजीवनाला दिशा देण-ारी प्रेरणाशक्ती आहे, हे या महोत्सवाने अधोरेखित केले. कीर्तनातून अध्यात्म आणि समाजसेवा यांचा सेतू बांधला जातो, आणि हीच वारकरी परंपरेची खरी ताकद आहे.

समाजात वाढत्या वैचारिक दुष्काळाच्या काळात अशा अध्यात्मिक सोहळ्यांची गरज पूर्वीपेक्षा अधिक आहे. कारण कीर्तन केवळ शब्दांचा मेळ नाही, तर ते आत्म्याला भिडणारे जीवनमार्गदर्शन आहे. वेदगंगा कीर्तन महोत्सवाने या परंपरेचे महत्व अधोरेखित करून अध्यात्म, संस्कार आणि समरसतेची गंगा वाहती ठेवली आहे.

# महिलांसाठी विट्यात 'जागर आदिशक्ती' कार्यक्रम

## २५ ते २७ सप्टेंबरअखेर विविध स्पर्धा

**विटा : हॅलो प्रभात**

नवरात्रीच्या पार्श्वभूमीवर शोभाकाकी बाबर फाउंडेशन व शोभाकाकी बाबर कन्या महाविद्यालय, यांच्या संयुक्त विद्यमाने २५ ते २७ सप्टेंबर दरम्यान 'जागरआदिशक्तीचा-२०२५' हा कार्यक्रम होणार आहे. तालुकास्तरीय म हिलांसाठी विविध स्पर्धा घेण्यात येणार आहेत. या स्पर्धा पंचफुला मंगल कार्यालय, मायणी रोड, विटा येथे सकाळी अकरा ते दुपारी तीन या वेळेत होणार असल्याचे सोनिया बाबर यांनी सांगितले.



महिला सक्षमीकरण, पारंपरिक कला जोपासणे आणि ग्रामीण, शहरी महिलांना समान संधी देण्याच्या उद्देशाने या स्पर्धाचे दरवर्षी आयोजन केले जाते. या स्पर्धेचे यंदा बारावे वर्ष आहे. पारंपरिक कला टिकून राहावी आणि महिलांच्या कलागुणांना योग्य व्यासपीठ मिळावे, यासाठी हे आयोजन केले जाते.

यामध्ये फ्री स्टाईल ग्रुप डान्स, मेहेंदी स्पर्धा, पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा (फ्री हँड), प्रश्नम ंजुषा, पोस्टर प्रेझेंटेशन, विषय (एक.आय.) चे दुष्परिणाम आणि प्लास्टिक बंदी, फेस पेंटिंग, मिस ब्युटी क्वीन अशा स्पर्धा होणार आहेत. विजेत्यांना बक्षिसे दिली जाणार आहेत.



# अनंतराव पवार अभियांत्रिकीच्या आशिताचे जलतरण स्पर्धेत यश

**पुणे : हॅलो प्रभात**

येथील अखिल भारतीय मराठा शिक्षण परिषदेच्या अनंतराव पवार अभियांत्रिकी महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स अँडटेलिकम्युनिकेशन इंजीनियरिंग या विभागात तृतीय वर्षात शिकणारी विद्यार्थिनी आशिता धोत्रे हिने आंतर-महाविद्यालयीन ५० मीटर फ्री स्टाईल व १५०० मीटर फ्री स्टाईल या जल-तरण प्रकारच्या स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. तिला पुणे शहर क्रीडा विभागाचे सहसचिव डॉ. अनिरुद्ध शर्मा यांच्या हस्ते पदक देऊन गौरविण्यात आले. या स्पर्धा सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ पुणे शहर क्रीडा विभाग व एम एम सी ओ ई यांच्या संयुक्त विद्यमाने डेक्कन जिमखाना येथील जलतरण तलावात पार पडल्या. तसेच चिरायू गौड व अनमोल मोरे यांनी वॉटरपोलो या जलतरण प्रकारात आपला सहभाग नोंदवला.

या स्पर्धेत महाविद्यालयाकडून आणखी राम जवळगे व ओंकार खरवडे यांनीही सहभाग घेतला होता. आशिताच्या यशामुळे संस्थेच्या सरचिटणीस प्रमिला-ताई गायकवाड, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनील ठाकरे, विभागप्रमुख डॉ. अमर देशमुख आणि आयक्यूएसी समन्वयक प्रा.गणेश कोंढाळकर यांनी तिचे अभिनंदन केले व पुढील विभागीय स्पर्धेसाठी व वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

आशिता व इतर सर्व स्पर्धकांना महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. नवनाथ सरोदे यांचे विशेष मार्गदर्शन लाभले.



# डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाचे मध्यवर्ती युवा महोत्सवात यश

**सांगली : हॅलो प्रभात**

शिवाजी विद्यापीठाच्या ४५ व्या मध्यवर्ती युवा म होत्सवात डॉ.पतंगराव कदम महाविद्यालयातील विद्यार्थिनी उत्कर्ष शहाजी कापसे हिने मेहंदी स्पर्धेमध्ये पाचवा क्रम ांक मिळविला.अशाप्रकारे विद्यार्थ्यांनीने हे यश मिळवून भारती विद्यापीठ आणि डॉ. पतंगराव कदम महाविद्यालयाच्या उज्वल यशाची परंपरा कायम ठेवली.

या मध्यवर्ती युवा महोत्सवाच्या यशाबद्दल म हाविद्यालयाचे प्र. प्राचार्य डॉ. एस. व्ही. पोरे यांनी विद्यार्थिनीस पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. व या मिळालेल्या यशाबद्दल कौतुक केले. तसेच महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. अमित सुपले, कनिष्ठ विभाग प्रमुख प्रा. ए. एल. जाधव यांनी विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.

सदर विद्यार्थिनीस सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ. वर्षा कुंभार व सांस्कृतिक सदस्य यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी यांनीही विद्यार्थिनीचे अभिनंदन केले.

हा मध्यवर्ती युवा महोत्सव शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे महाविद्यालय मिरज येथे संपन्न झाला. या शिवाजी विद्यापीठाच्या युवा महोत्स-वामध्ये १७८ महाविद्यालयांनी सहभाग नोंदवला होता.

# संसदीय कामकाज प्रशिक्षण प्रतिकृतीचे उद्घाटन

**हातकणंगले : हॅलो प्रभात**

मजले (ता. हातकणंगले) येथे जिजाऊ बालविकास मंदिर, मजले येथे संसदीय कामकाजाच्या प्रशिक्षणासाठी साकारण्यात आलेल्या प्रतिकृतीचे उद्घाटन खासदार धैयशील माने यांच्या हस्ते करण्यात आले.या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून किरण पाटील व संजय पाटील सर होते सुजनशक्ती श्रमिक फाउंडेशनचे सचिव किरण पाटील व अध्यक्ष संजय पाटील उपस्थित होते, स्थानिक लोकप्रतिनिधी, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक, पालक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



कार्यक्रमाच्या सुरुवातीला मजले सरपंच मधुमिता पाटील उपसरपंच मीनाक्षी कुंभोजे पोलीस पाटील मीनाक्षी पाटील ग्रामपंचायत सदस्य बाबासो रेडेकर, नंदकुमार कोठावळे लक्ष्मीबाई जाधव, मुख्याध्यापक दत्तात्रय माने, खजिनदार ओम पाटील, सचिव नयना पाटील उपस्थित होते. उपस्थित होते दीपप्रज्वलन करून उद्घाटन सोहळ्यास सुरुवात करण्यात आली. खा.धैयशील माने यांनी आपल्या भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांमध्ये संसदीय प्रक्रिया, लोकशाही मूल्ये आणि निर्णय प्रक्रियेची समज विकसित करणे अत्यंत गरजेचे आहे. अशा प्रशिक्षण प्रतिकृतीद्वारे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष कृतीतून शिक्षण मिळते, जे त्यांना जबाबदार नागरिक बनवण्याच्या दृष्टीने उपयुक्त ठरते. प्रशिक्षण प्रतिकृतीमध्ये लोकसभा कार्यपद्धती, चर्चा सत्रे, विधेयक प्रक्रिया यांची शास्त्रशुद्ध मांडणी करण्यात आली आहे.

विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष संसद सत्रासारखा अनुभव देणारी ही अभिनव कल्पना शाळेच्या मुख्याध्यापिका पद्मश्री पाटील व शिक्षकांनी राबवली आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्रीमती अश्विनी पाटील यांनी केले, तर आभारप्रदर्शन राकेश पाटीलयांनी केले. कार्यक्रमाची सांगता संविधान गीताने झाली.



# कोपरगाव औद्योगिक वसाहतीची वार्षिक सभा उत्साहात संपन्न

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

कोपरगाव औद्योगिक सहकारी वसाहतीची ६५ वी वार्षिक सभा उत्साहात पार पडली. या सभेचे अध्यक्षस्थान वसाहतीचे चेअरमन युवानेते विवेकभैय्या कोल्हे यांनी भूषवले. सभेची सुरुवात मागील वर्षाचे इतिवृत्त वाचून कायम करण्यात आली. तसेच चालू आर्थिक वर्षातील महत्त्वाचे विषय सर्वानुमते मंजूर करण्यात आले आणि पुढील विकासासाठी उद्दिष्ट निश्चित करण्यात आले.

कोपरगाव औद्योगिक वसाहतीचा विकास झपाट्याने सुरू असून वसाहतीतील अंतर्गत रस्ते, कारखानदारांना मिळणाऱ्या सुविधा आणि वैशिष्ट्यपूर्ण धोरणांची अंमलबजावणी यामुळे उद्योग वसाहत अधिक सक्षम बनत आहे. नवउद्योजकांना प्रोत्साहन देण्यासाठी या सभेत विशेष सन्मान करण्यात आला. पल्लवी गोरक्षनाथ खळेकर यांना नवउद्योजक पुरस्कार, वंदना शरद पाटोळे यांना आदर्श उद्योजक पुरस्कार तर साईनाथ रंगनाथ राहणे यांना कोपरगाव तालुक्यातील नवउद्योजक पुरस्कार प्रदान करण्यात आला.यावेळी बोलताना चेअरमन विवेकभैय्या कोल्हे यांनी सांगितले की,



वसाहतीमध्ये नाविन्यपूर्ण सुधारणा व आवश्यक ती विकासकामे करण्यासाठी संचालक मंडळ सातत्याने प्रयत्नशील आहे. कारखानदार व गाळाधारक यांचे हित जपण्यासाठी सकारात्मक निर्णय विविध पातळ्यांवर घेतले जातील. औद्योगिक वसाहत ही केवळ कारखानदारांसाठी नाही तर संपूर्ण तालुक्याच्या आर्थिक प्रगतीचे केंद्रबिंदू आहे, असेही त्यांनी नमूद केले.

या वार्षिक सभेला सर्व संचालक मंडळ सदस्य, कारखानदार, गाळाधारक व मान्यवर उपस्थित होते. सभेच्या यशस्वी आयोजनामुळे कोपरगाव औद्योगिक वसाहतीच्या विकासाला नवे बळ मिळाले असून पुढील काळातही वसाहतीचा सर्वांगीण विकास वेगाने होत राहील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

जवळके येथील नवउद्योजक साईनाथ राहणे यांनी आमच्या गावाकडे बस येण्यासारखी सुद्धा परिस्थिती नाही व बस देखील येत नाही अशी खंत व्यक्त केली.यावरून त्या भागातील रस्त्यांचा प्रश्न किती ऐरणीवर आहे हे समोर आले. मात्र दुसरीकडे विवेकभैय्या कोल्हे यांच्यामुळे औद्योगीक वसाहतीमध्ये अतिशय चांगल्या सुविधा उपलब्ध आहेत याचा आनंद वाटतो. यावर प्रतिक्रिया देताना विवेकभैय्या कोल्हे यांनी तालुक्यातील रस्त्याची समस्या किती गंभीर आहे त्याकडे सर्वांनी लक्ष देण्याची गरज आहे कारण उद्योजकांना चांगले रस्ते मिळाले तर व्यवसायाला गती निर्माण होऊ शकते याकडे लक्ष वेधले व बस आगारात लोकसंख्येच्या तुलनेत बस संख्या कमी पडण्यावर भाष्य केले. यासभेसाठी उपाध्यक्ष केशवराव भवर व सर्व संचालक मंडळ,गोदावरी दूध संघाचे चेअरमन राजेश परजणे,कोल्हे कारखाना संचालक ज्ञानेश्वर परजणे, माजी संचालक गुलाबराव वरकड,बाळासाहेब शेटे, औद्योगिक वसाहत माजी चेअरमन राजेंद्र शिंदे,कारखानदार, गाळेधारक, उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सरसकट पिकांचे पंचनामे करावेत : राजूमामा तागड

**राहुरी : हॅलो प्रभात**



मुसळधार पावसामुळे एकंदरीत जी परिस्थिती उद्भवलेली आहे व शेतकऱ्यांची अवस्था बघता सरसकट पंचनामे करणे आवश्यक आहे .अगोदरच मेटाकुटीस आलेल्या शेतकऱ्यांना उगाच कागदी घोडे नाचवायला भाग पाडू नका. पिकाच्या सर्व नोंदी व क्षेत्रफळ सरकार दरबारी उपलब्ध आहे. क्षेत्रफळाच्या दृष्टीने पंचनाम्यासाठी अधिकाऱ्यांची संख्या कमी असल्यामुळे मागील वर्षी प्रमाणे अनेक शेतकरी वंचित राहण्याची दाट शक्यता आहे. म्हणून शेतकऱ्यांच्या वतीने कृषी सहाय्यक, तलाठी व वरिष्ठ अधिकाऱ्यांना विनंती करण्यात येत आहे की परिसराचा आढावा घेऊन एकही शेतकरी वंचित राहणार नाही अशा पद्धतीने सरसकट पिकांचे पंचनामे करावे.

# भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदाला संकेत सुर्यवंशीची गवसणी



## निवडीबद्दल आत्मा मालिक ध्यानपीठातर्फे गौरव

**कोपरगांव : हॅलो प्रभात**

येथील आत्मा मालिक ध्यानपीठातील सेवक भगवान सूर्यवंशी यांचे पुत्र संकेत सूर्यवंशी यांनी खडतर परिस्थितीवर मात करीत भारतीय सैन्यात लेफ्टनंट पदाला गवसणी घातली. या यशाबद्दल आत्मा मालिक ध्यानपीठाच्या वतीने प. पू. आत्मा मालिक माऊली यांच्या उपस्थितीत संत परमानंद महाराज, निजानंद महाराज आदींसह संत व विश्वस्तांच्या उपस्थितीत त्यांचा हृद्य सत्कार करण्यात आला.मूळचे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील वैजापूरच्या मनोली येथील असलेले सूर्यवंशी कुटुंब सुमारे वीस वर्षांपासून आत्मा मालिक माऊलींच्या सेवेत आहे. त्यांचा पुत्र संकेत यांनी प्राथमिक व माध्यमिक शिक्षण आत्मा मालिक इंग्लिश मीडियम स्कूलमध्ये घेतले. त्यानंतर त्यांची छत्रपती संभाजीनगर येथील सेवापूर्व प्रशिक्षण संस्थेत (एसपीआय) दोन वर्षांच्या एनडीए प्रशिक्षणासाठी निवड झाली. त्यानंतर त्यांनी पुणे येथील सर परशुरामभाऊ महाविद्यालयातून संख्याशास्त्र विषयात पदवी घेतली. शिक्षणाबरोबरच त्यांनी एनसीसीचेही प्रशिक्षण घेतले. सन २०२४ मध्ये केंद्रीय लोकसेवा आयोगामार्फत घेण्यात आलेल्या कंबाइंड डिफेन्स सर्व्हिसेस (सीडीएस) परीक्षेत भारतीय हवाई दलातील पायलट पदासाठी त्यांची निवड होऊन त्यांनी संपूर्ण भारतात १५ वा क्रमांक मिळवला. पुढे २०२५ मध्ये भारतीय सैन्याच्या एनसीसी स्पेशल एंट्री परीक्षेत ५ वा क्रमांक मिळवत त्यांची निवड चेन्नई येथील ऑफिसर्स ट्रेनिंग अकॅडमीमध्ये झाली आहे. लवकरच ते एक वर्षाचे प्रशिक्षण पूर्ण करून लेफ्टनंट पदावर रुजू होणार आहेत. अतिशय खडतर परिस्थितीत मोठ्या कष्टाने यश मिळविल्याबद्दल विश्वात्मक जंगली महाराज आश्रम ट्रस्टच्या वतीने आत्मा मालिक माऊलींच्या उपस्थितीत संकेत यांचा भव्य सत्कार करण्यात आला. यावेळी संत परमानंद महाराज, निजानंद महाराज, साधनानंद महाराज, विवेकानंद महाराज, गायकवाड महाराज, बबन महाराज, प्रेमानंद महाराज, विजयानंद महाराज, दादा महाराज, जाधव महाराज, संत शांतिमाई, प्रभावती माई, स्मृतिमाई, ध्यानीमाई, स्वरूपामाई, सरस्वतीमाई, शिवानीमाई, तपस्विनीमाई, भगवतीमाई, यामिनीमाई यांच्यासह संस्थेचे विश्वस्त हनुमंतराव भोंगळे, बाळासाहेब गोरडे, प्रदीप भंडारी, प्रकाश गिरमे, केदार सारडा, ज्ञानदेव सांगळे, संकेत यांचे पालक मीरा व भगवान सूर्यवंशी आदी उपस्थित होते.

# तलवारबाजी स्पर्धेत संजीवनी कॉलेजचे घवघवीत यश



## सुवर्ण, रजत व कांस्य पदकांची कमाई

**कोपरगाव : हॅलो प्रभात**

अहिल्यानगर जिल्हास्तरीय तलवारबाजी स्पर्धांमध्ये संजीवनी सैनिकी स्कूल अँड ज्युनिअर कॉलेजच्या तलवारबाजी खेळाडूंनी शारीरिक कौशल्य, रणनिती आणि मानसिक चपळतेच्या जोरावर वेगवेगळ्या वयोगटात सुवर्ण, रजत व कांस्य पदकांची कमाई करून क्रीडा क्षेत्रातील वर्चस्व सिध्द केले. क्रीडा व युवक सेवा संचालनालय महाराष्ट्र राज्य पुणे, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व जिल्हा तलवारबाजी असोसिएशनच्या वतीने के. बी. रोहमारे कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालय, कोपरगाव येथे या स्पर्धा घेण्यात आल्या. या स्पर्धांमध्ये १४ वर्षे वर्शे वयागटांतर्गत इयत्ता ६ वी मधिल कॅडेट पार्थ सोनवणे याने दमदार खेळ करत सुवर्णपदक पटकावले. १७ वर्षांखालील वयोगटात इयत्ता ९ वीचा कॅडेट स्पर्श शिवरकर हा सुवर्ण पदकाचा मानकरी ठरला. इयत्ता १० वीतील कॅडेट वेदांत खेतमाळस आणि चेतन जाधव यांनी प्रत्येकी रजत पदक मिळविले, तर कॅडेट साई बोळीज याने कांस्यपदक मिळविले. १९ वर्शांखालील गटात इ वीचा कॅडेट वेदांत गायकवाड याने रजत पदक तर कॅडेटइ १११ वीचा जयेश साळुंखे याने कांस्यपदकाला गवसणी घातली. या सर्व विजेत्या खेळाडूंची निवड सोलापूर येथे होणाऱ्या विभागीय तलवारबाजी स्पर्धेसाठी झाली आहे. संजीवनी सैनिकी स्कूलच्या विद्यार्थ्यांच्या यशामागे तलवारबाजी प्रशिक्षक पवन शिरसाट सर यांचे परिश्रम व दर्जेदार मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले. नियमित सराव, शिस्तबद्ध तयारी आणि स्पर्धेतील आत्मविश्वास या गुणांमुळे विद्यार्थ्यांनी घवघवीत यश मिळविले.

संजीवनीचे अध्यक्ष नितीनदादा कोल्हे, मॅनेजिंग ट्रस्टी अमित कोल्हे, विश्वस्त सुमित कोल्हे तसेच प्राचार्य कैलास दरेकर यांनी सर्व खेळाडूंचे कौतुक करून त्यांचे अभिनंदन केले. तलवारबाजी सारख्या खेळामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, आत्मविश्वास व लढाऊ वृत्ती निर्माण होते. अशा यशामुळे संजीवनी संस्थेच्या क्रीडा संस्कृतीला बळ मिळत आहे.

# पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून शेतकऱ्यांना मदत द्या : प्राजक्त तनपुरे

**राहुरी : हॅलो प्रभात**

गेल्या काही दिवसांपासून सुरू असलेल्या सततच्या पावसामुळे राहुरी तालुक्यातील शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. शासनाकडून अतिवृष्टीचा ७५ मि.मी. चा नियम लागू असला, तरी रोज ५० मि.मी. पाऊस सतत कोसळत असल्याने शेतांमध्ये गुडघ्यापर्यंत पाणी साचले आहे. त्यामुळे कापूस, सोयाबीन यासारख्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून शेतकरी चिंतातूर अवस्थेत आहेत.



माजी मंत्री प्राजक्त तनपुरे यांनी राहुरी तालुक्यातील काळे आखाडा, जोगेश्वरी आखाडा व येवले आखाडा परिसरातील शेतकऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेत शेतांच्या बांधावर जाऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत त्यांना दिलासा दिला.

शासनाने तांत्रिक बाबीत अडकून न पडता तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना मोठ्या प्रमाणात नुकसानभरपाई द्यावी. अजूनही तालुक्यात पंचनाम्यांची प्रक्रिया सुरू झालेली नाही. त्यामुळे तहसीलदार, कृषी अधिकारी व तलाठ्यांना मी फोन करून तातडीने पंचनामे सुरू करण्याची मागणी तनपुरे यांनी केली .यावेळी बाळासाहेब उंडे, प्रशांत डौले, शहाजी ठाकूर, प्रकाश भुजाडी, दादासाहेब सरोदे, सदाशिव गुंजाळ, सुखदेव काळे, गीताराम काळे, अंबादास काळे, रामेश्वर काळे, किशोर जाधव, मारुतीराव हारदे, सुनील काळे, अण्णासाहेब काळे, राहुल तागड यांच्यासह मोठ्या संख्येने नुकसानग्रस्त शेतकरी उपस्थित होते. शेतकऱ्यांना जास्तीत जास्त नुकसानभरपाई मिळावी यासाठी मी प्रयत्नशील राहणार असल्याचे आश्वासन तनपुरे यांनी दिले.

# कानगांव बंदला शंभर टक्के प्रतिसाद

## आठवडी बाजार असूनही कडकडीत बंद

**दौंड : हॅलो प्रभात**

कानगांव ( ता.दौंड ) येथे बुधवार दि. २४ सप्टेंबर रोजी आठवडी बाजारा दिवशी शेतकरी आक्रोश कृती समितीच्या वतीने पुकारण्यात आलेल्या कानगांव बंद आंदोलनाला शंभर टक्के प्रतिसाद मिळाला. बुधवार हा आठवडी बाजाराचा दिवस व या बाजारासाठी कानगांवसह परिसरातील अनेक गावांतील व्यापारी, ग्रामस्थ आठवडी बाजारासाठी येत असतात परंतु बुधवारी सकाळपासूनच कडकडीत बंद दिसून आला.



गावातील सर्व व्यापाऱ्यांनी दुकाने बंद ठेवून सर्व व्यापाऱ्यांनी या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला.

कांद्याला ३५ रुपये हमीभाव मिळावा, संपूर्ण कर्जमाफी मिळावी या सहित इतर मागण्यांसाठी कानगांव येथील विठ्ठल मंदिरामध्ये धरणे आंदोलन चालू आहे. आंदोलनाचा आज सातवा दिवस असून शेतकरी आंदोलक आपल्या मागण्यांवर ठाम आहोत. कानगांव येथील बाजारपेठा बंद ठेवून व्यापाऱ्यांसह अन्य घटकांनीही बळीराजाच्या आंदोलनाला साथ दिली. कानगांव येथे जीवनावश्यक वस्तूंच्या दुकाने वगळता कडकडीत बंद पाळण्यात आला. प्रशासनाने आमच्या मागण्या मान्य करण्याच्या मागण्यांसाठी पुकारण्यात आलेल्या बंद आंदोलनामुळे गावातील बाजारपेठेत शुकशुकाट होता.

### बच्चू कडू यांचा शेतकऱ्यांशी संवाद

माजी मंत्री बच्चू कडू यांनी कानगांव येथील बेमुदत धरणे आंदोलनातील शेतकऱ्यांशी व्हिडिओ कॉलद्वारे संपर्क साधून शेतकऱ्यांचे अभिनंदन केले. हे आंदोलन राज्यव्यापी आंदोलन कसे होईल यासाठी प्रयत्न करु, आपन सर्व एकत्र येऊन मोठे आंदोलन करुन २८ ऑक्टोबरला संपूर्ण कर्जमुक्तीसाठी मुंबईच्या दिशेने आगेकूच करु असे आवाहन बच्चू कडू यांनी केले. आंदोलकांचे अभिनंदन करुन पाठिंबा जाहीर केला

# भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या जात प्रमाणपत्र मोहीमेची यशस्वी कार्यवाही

**दौंड : हॅलो प्रभात**

पुरंदर तालुक्यातील जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्था संस्थापक अध्यक्ष विजय जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली भटक्या विमुक्त जाती-जमातीच्या नागरिकांसाठी जात दाखला अभियान यशस्वीरीत्या पार पडले. या मोहिमेचा मुख्य उद्देश समाजातील गरजू लोकांना कायदेशीर ओळख व प्रमाणपत्र मिळवून देणे आणि प्रशासनाशी



थेट संपर्क साधण्याची संधी उपलब्ध करणे हा आहे. या मोहिमेअंतर्गत कुमारी कल्याणी सावंत व कुमारी दिव्या सावंत यांना उपविभागीय अधिकारी तथा कार्यकारी दंडाधिकारी (प्रांत) श्रीमती वर्षा लांडगे आणि तहसीलदार विक्रम राजपूत यांच्या शुभहस्ते प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले. अभियानाच्या यशाबद्दल प्रशासनानेही कौतुक व्यक्त केले. उपविभागीय अधिकारी व प्रांत अधिकारी वर्षा लांडगे मॅडम यांनी सांगितले की, या संस्थेने घेतलेला पुढाकार आणि शासनास दिलेली मदत अत्यंत प्रशंसनीय आहे. भविष्यातील योजना राबवण्यासाठी बैठकीचे आयोजन लवकरच केले जाईल. यावेळी जय भैरवनाथ संस्थेचे सर्व समन्वयक,बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवासी नायब तहसीलदार संदीप पाटील, महसूल नायब तहसीलदार वाघ मॅडम, मंडल अधिकारी जेजुरी बडदे, परिंचे बनसोडे, वाल्हे भिसे यांनी सकर्मक योगदान दिले.

यावेळी लमान समाजाचे नेते दशरथ माळी, कडकलक्ष्मी समाजाचे नेते मोहन निंबाळकर, मरीआई समाजाचे नेते विलास पवार व प्रल्हाद गायकवाड, नाथपंथी डवरी गोसावी समाजाचे विलास जगताप आणि इतर मान्यवर उपस्थित होते. या यशस्वी मोहिमेमुळे समाजात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, गरजू लोकांना त्यांच्या हक्कांची जाण आणि न्याय मिळविण्याची संधी प्राप्त झाली आहे. जय भैरवनाथ सामाजिक सेवाभावी संस्था आगामी काळातही समाज कल्याणाच्या विविध उपक्रमांमध्ये सक्रिय राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे.

# गौरव हाच शिक्षकाचा सर्वोच्च पुरस्कार असतो : शिक्षणाधिकारी बुगे



## किर्ती पालवे यांना बदलीनंतर हृदयस्पर्शी निरोप

**शेवगाव : अजय नजन**

उपक्रमशिल शिक्षिका किर्ती पालवे यांनी प्रामाणिकपणाने मोठे परिश्रम घेऊन शाळेच्या गुणवत्ता वाढीबरोबरच भौतिक सुविधांत वाढ केली. बदली ही प्रशासनाचा भाग आहे. परंतु, बदलीनंतर विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांनी शिक्षिका पालवे यांच्या चांगल्या कामाचा केलेला गौरव हाच शिक्षकांचा सर्वोच्च पुरस्कार आहे. असे गौरवोद्गार शिक्षणाधिकारी ( योजना ) बाळासाहेब बुगे यांनी काढले.खामगाव ( ता.शेवगाव ) येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेतील प्राथमिक शिक्षिका किर्ती पालवे यांची १४ वर्षांच्या सेवेनंतर बदली जोहरापूर येथे झाल्याने त्यांच्या निरोप समारंभाचे खामगाव शाळेत आयोजन करण्यात आले होते. यावेळी खामगाव शाळेचे विद्यार्थी, पालक, ग्रामस्थ तसेच जोहरापूर व भातकुडगाव केंद्रातील शिक्षकांची मोठी उपस्थिती होती. यावेळी अध्यक्षपदावरून बोलताना शिक्षणाधिकारी बुगे म्हणाले की, मी शेवगावला गटशिक्षणाधिकारी असतानाच्या काळात खामगाव जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेला आयएसओ मानांकन मिळाले. त्यानंतरच्या काळात मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा टप्पा क्र. १ मध्ये तालुक्यात खामगाव शाळेने प्रथम क्रमांक मिळवला. शैक्षणिक गुणवत्तेसाठी डिजीटल शाळा, सकस पोषण आहारासाठी परसबाग यासह अनेक उपक्रम शिक्षिका पालवे व त्यांच्या सहकार्यांनी पालक व ग्रामस्थांच्या सहकार्याने राबवले. त्यांच्या कामात प्रामाणिकपणा नेहमीच दिसून आला. त्यांनी विद्यार्थी, पालक व ग्रामस्थांच्या मनात जागा निर्माण केली हेच त्यांच्या चांगल्या कामाचे लक्षण आहे. गटशिक्षणाधिकारी शैलजा राऊळ, जिल्हा परिषदेचे माजी सभापती प्रा. शाहुराव घुटे, सरपंच उषाताई बडधे, सामाजिक कार्यकर्ते बाबूलाल पटेल, प्राथ. शिक्षक बँकेचे संचालक रमेश गोरे, गंगा खेडकर, आदी या वेळी उपस्थित होते.

# निवडणूक डोळ्यासमोर ठेवून विरोधकांची नौटंकी

## प्राजक्त तनपुरे

**राहुरी : हॅलो प्रभात**

नगरपरिषदेला विरोधकांनी एक छदाम निधी दिला नाही. डीपीडीसीच्या निधीच्या कामांचा प्रारंभ करून त्यांनी माझ्यावर टीका केली. राहुरी नगरपरिषदेवर चार वर्षापासून प्रशासकराज आहे.

राज्यात तीनं वर्षापासून भाजपची सत्ता आहे. याचा त्यांना सोईस्कर विसर पडला. आता नगरपरिषदेची निवडणूक डोळ्यासमोर ठेवून त्यांची नौटंकी सुरू झाली आहे, अशी टीका प्राजक्त तनपुरे यांनी आमदार शिवाजी कर्डिले यांच्यावर पत्रकार परिषदेत केली.राहुरी येथे आमदार शिवाजी कर्डिले यांनी नगरपरिषद हद्दीतील रस्त्यांच्या कामाचा प्रारंभ केला. यावेळी त्यांनी केलेल्या टीकेचा तनपुरे यांनी खरपूस समाचार घेतला.



तनपुरे म्हणाले, राहुरी नगरपरिषद हद्दीत भूमिगत गटार योजनेच्या कामामुळे रस्त्यांची प्रचंड दुरवस्था झाली आहे. अनेक विकास कामे रखडली आहेत. मागील तीन वर्षांपासून राज्यात भाजपची सत्ता व पालिकेत शासनातर्फे नियुक्त प्रशासक आहे. राहुरी नगरपरिषदेच्या खुंटलेल्या विकास कामांना भाजप सरकार जबाबदार आहे. मागील तीन वर्षात राज्यसरकारतर्फे विशेष निधी आणण्यासाठी आमदार कर्डिले यांचा कोणी हात धरला नव्हता. त्यांनी अजूनही निधी आणावा, आमची हरकत नाही. परंतु राहुरी पालिकेचा मंजूर निधी कर्जत पालिकेला वळविण्यात आला. माझ्या आमदारकीच्या काळात राहुरी नगरपरिषद हद्दीत राज्य सरकारच्या विशेष निधीतून कोट्यवधी रुपये आणले. शहराची सुधारित पाणी योजना, भूमिगत गटार योजना, जॉगिंग ट्रॅक, बंदीस्त जलतरण तलाव, तीन कमानी, शहरातील चौकांचे सुशोभीकरण, सौर ऊर्जेवरील पथदिवे अशा विविध विकास कामांना निधी मिळविला. भूमिगत गटार योजनेच्या कामाचा नारळ फोडून श्रेय लाटण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. राहुरी नगरपरिषदेला नगराध्यक्ष नाही. नगरसेवक नाहीत. पूर्णवेळ मुख्याधिकारी नाहीत. देवळाली प्रवरा नगरपरिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांकडे राहुरीचा अतिरिक्त कार्यभार आहे. त्यांनी अगोदर राहुरी नगरपरिषदेला पूर्णवेळ मुख्याधिकारी नियुक्त करून घ्यावेत. राहुरी नगरपरिषदेच्या नागरिकांची थकीत मालमत्ता कराची शास्ती ५० टक्के माफ केली, ती इतर नगरपरिषदेसारखी १०० टक्के माफ करून घ्यावी.

# व्यवसायिकांसाठी खुशखबर

सांगली,कोल्हापूर,सातारा,सोलापूर,पुणे,
अहमदनगर सह संपूर्ण महाराष्ट्रात
डिजिटलच्या माध्यमातून तब्बल सात लाख वाचकांपर्यंत
पोहोचणाऱ्या दैनिक **हॅलो प्रभात** सोबत
आपल्या व्यवसायाची जाहिरात करण्याची...



## सुवर्णसंधी



| जाहिरात साईज | प्रसिद्धी कालावधी | किंमत |
|---|---|---|
| 08X05 cm | संपूर्ण महिना | ५000/- |
| 08X10 cm | संपूर्ण महिना | ७000/- |
| 12X10 cm | संपूर्ण महिना | १0000/- |

टीप : सदर जाहिरातीचे दर हे फक्त डिजिटल आवृत्तीसाठी लागू आहेत.

**शुभेच्छा जाहीरात, जाहीर नोटीस,
छोट्या जाहीराती, टेंडर नोटीस व सर्व प्रकारच्या
जाहीरात प्रसिद्धीसाठी...**

## एकवेळ अवश्य संपर्क साधा

# दै.हॅलो प्रभात

**फोन : 9094277171 / 9011889001**

• छापील प्रत मिळिवण्यासाठी संपर्क : 9021651976